अतारांकित प्रश्नोत्तरांची १३ वी यादी

महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

(१) १४९ (२७-०४-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेत अग्निशमन विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची ३५० पदे रिक्त असल्याची बाब दिनांक २ जानेवारी २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहराच्या वाढत्या विस्तारीकरणाच्या प्रमाणात अग्नीशमन विभागावर प्रचंड ताण निर्माण झाला असून गत तीन वर्षभरात २८५२ आगीच्या घटना नोंदविण्यात आल्या असून त्यामध्ये जीवितहानी झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरात २० अग्निशमन केंद्रांची आणि १३०० वर कर्मचाऱ्यांची गरज असताना सद्यस्थितीत नागपूर महानगरपालिका शहरात ११ अग्निशमन केंद्रांमध्ये १२० कर्मचारी कार्यरत असून ८७२ मंजूर पदे रिक्त आहेत तसेच ९० मीटर हायड्रॉलिक प्लॅटफॉर्म उभारण्याचे कामही प्रलंबित असल्याचे दि. ११ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय;

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुसार यंत्र सामग्री खरेदी करणे, आणि नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे,

नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात सद्यस्थितीत एकूण ८७२ मंजूर पदांपैकी १२७ पदांवर कर्मचारी कार्यरत असून ७४५ पदे रिक्त आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे,

नागपूर शहरात मागील तीन वर्षात १ एप्रिल २०२२ ते ३१ र्च २०२५ पर्यंत एकूण २४१४ आगीच्या घटनांची अग्निशमन व आपात्कालीन सेवा विभागातर्फे नोंद घेतली आहे. त्यात त्यामध्ये एकुण २२ व्यक्ती जखमी व ५ मृत पावले आहेत.

(३) राज्यातील (बृहन्मुंबई मनपा वगळता) इतर सर्व महानगरपालिकांमधील अग्निशमन संवर्गातील पदांकरिता आदर्श सामाईक सेवा प्रवेश नियमांचा प्रारुप मसुदा शासनाच्या दि. १२.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन संवर्गातील पदांच्या सेवाप्रवेश नियमांत सुधारणा करणेबाबत आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांना शासनाच्या दि. १८.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार महानगरपालिकेद्वारे सुधारित सेवाप्रवेश नियम तयार करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

तसेच ७० मीटर उंचीची हॅड्रोलिक प्लॅटफॉर्म खरेदी प्रक्रीया पूर्ण झाली असून त्यांचा अग्निशमन वाहनांच्या ताफ्यामध्ये समावेश करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

वाडा (जि.पालघर) तालुक्यातील सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत भात खरेदी केंद्रावर भात भरण्यासाठी गोणी उपलब्ध करुन देण्याबाबत

(२) १८० (२८-०४-२०२५). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील परळी, मानिवली, गो-हे, गुहीर, पोशेरी, कोनसई, सारशी, खैरे-आंबिवली सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत भात खरेदी केंद्रावर भात भरण्यासाठी गोणी उपलब्ध नसल्याने आदिवासी शेतकऱ्यांचे नुकसान होत असून याबाबत शेतकऱ्यांनी दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास तक्रारी केल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार भात खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांना गोणी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (०७-१०-२०२५) : (१) हे खरे नाही, वाडा तालुक्यातील खरेदी केंद्रावर भात भरण्यासाठी बारदाना उपलब्ध नसल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

(२) शासनाकडून धान खरेदीसाठी उपलब्ध करून दिला जाणारा बारदाना तसेच गिरणीधारकांकडून जमा होणारा बारदाना असे मिळून खरेदी केंद्राना वेळोवेळी बारदाना उपलबध करून देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील मलबार हिल परिसरात पहिली तरंगती पायवाट पर्यटकांकरिता सुरु करण्याबाबत

(३) ६१९ (२७-०४-२०२५). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मलबार हिल परिसरात पहिली तरंगती पायवाट(एलिव्हेटेड फॉरेस्ट वॉकवे) बांधण्यात येत असून हा प्रकल्प माहे डिसेंबर २०२४ मध्ये पर्यटकांसाठी खुला केला जाणार होता, मात्र २०२५ आले तरी अद्याप सुरू झालेला नसल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पास विलंब होण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करून तरंगती पायवाट लवकरात लवकर पर्यटकांसाठी खुली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१८-०९-२०२५) : (१) हे अंशतः खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मलबार हिल परिसर, मुंबई येथे पहिली तरंगती पायवाट (एलिव्हेटेड फॉरेस्ट वॉकवे) बांधण्याबाबतच्या महत्वाकांक्षी प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले होते. सदर प्रकल्पाचे काम मुंबई शहरात डोंगर उतारावरील भूभागावर प्रथमच करण्यात आले असून भौगोलिक व तांत्रिक दृष्टया आव्हानात्मक होते. सदर कामात प्रथमच गर्दीच्या नियंत्रणाकरिता प्रवेश नियंत्रण प्रणाली, निसर्ग उन्नत मार्गावर देखरेखीकरिता सी.सी.टी.व्हि बसविणे, नाविण्यपूर्ण पध्दतीचे प्रवेशव्दार आणि नियंत्रण कक्षाची विशिष्ट प्रकारची बाहय रचना इत्यादी बाबी प्रस्तावित असल्याकारणाने त्याकरिता त्यांचे काटेकोरपणे आराखडे, संरचना तयार करणे व काम पूर्ण झाल्यानंतर निसर्ग उन्नत मार्ग प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यापूर्वी सर्व बाबीं सुरळीतपणे असल्याबाबतची खातरजमा करुन घेणे आवश्यक होते. सद्यस्थितीत सदर प्रकल्पातील उन्नत मार्ग नियंत्रण कक्ष संरचना, प्रवेश नियंत्रण प्रणाली व संबंधित सर्व कामे पुर्णत्वास जाऊन प्रकल्पाचे दि.३० मार्च,२०२५ रोजी लोकार्पण करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईमधील अंधेरी पूर्व येथे नवीन अद्ययावत रुग्णालयाची निर्मिती करण्याबाबत

(४) ६३४ (०१-०५-२०२५). श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमधील अंधेरी पूर्व हे मुंबईमधील एकमेव औद्योगिक क्षेत्र असून अंधेरी पूर्व क्षेत्रात शासनाचे किंबहुना महानगरपालिकेचे एकही सुसज्ज अद्ययावत रुग्णालय नसल्याने येथील गोरगरीब रुग्णांची रुग्णालया अभावी होणारी गैरसोय लक्षात घेऊन शासनाने या ठिकाणी सुसज्ज अद्ययावत रुग्णालयाची निर्मिती करावी, अशी मागणी माहे डिसेंबर, २०२४ वा त्या सुमारास नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनात स्थानिक लोकप्रतिनिधी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंधेरी पूर्व क्षेत्रात शासनाचे अद्ययावत, सुसज्ज रुग्णालय निर्मिती करण्यासाठी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) अंधेरी पूर्व येथील के पूर्व विभागातील महानगरपालिकेचे सेवन हिल्स रुग्णालय हे सार्वजनिक खाजगी सहभाग प्रकल्पांतर्गत सुरु आहे.

या रुग्णालयामध्ये ३०६ रुग्णशय्या कार्यरत असून महानगरपालिकेच्या रुग्णांना २०% रुग्णशय्या व बाह्यरुग्ण विभागात उपचाराकरीता राखीव आहेत. अंधेरी पूर्व येथील एमआयडीसी पासून सदर रुग्णालय २.३ कि.मी इतक्या अंतरावर आहे.

या शिवाय के पश्चिम विभागातील महानगरपालिकचे कूपर रुग्णालय व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महाविद्यालय हे अंधेरी औद्योगिक क्षेत्रापासून ६ कि.मी अंतरावर असून यांच्याशी संलग्न असलेले ३०६ रुग्णशय्येचे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर रुग्णालय, जोगेश्वरी (पू) के पूर्व विभाग येथे असून सदर सुसज्ज रुग्णालय अंधेरी औद्योगिक क्षेत्रापासून ४.२ कि.मी अंतरावर आहे.

तसेच सांताक्रूझ (पूर्व) येथील महानगरपालिकचे सर्व सुविधा असलेले वि. न. देसाई रुग्णालय, अंधेरी औद्योगिक क्षेत्रापासून ७ कि.मी अंतरावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील बोरिवली येथील कांदिवली पूर्व येथे जोडणा-या रस्त्यामुळे सिंग इस्टेट येथील घरे बाधित होणार असल्याबाबत

(५) १७९९ (०१-०५-२०२५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बोरिवली येथील लोखंडवाला सर्कल ते ठाकूर शाम नारायण सर्कल ठाकूल व्हिलेज कांदिवली पूर्व येथे जोडणा-या १२० फुटी रस्त्यामुळे सिंग इस्टेट येथील जवळपास ३१५ घरे बाधित होणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या रस्त्यांची मार्गिका (अलाईमेंट) थोडीशी वळवून सिंग इस्टेट रोड क्र.२ येथे करण्यात आल्यास बाधित घरांची संख्या ५० ते ६० इतकीच होईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२४-०९-२०२५) : (१) अंशत: खरे आहे, मुंबईतील बोरिवली येथील लोखंडवाला सर्कल ते ठाकूर शाम नारायण सर्कल ठाकूर व्हिलेज कांदिवली पूर्व येथे जोडणाऱ्या ३६.६० मी रुंदीच्या प्रस्तावित विकास नियोजित रस्त्यात सिंग इस्टेट येथे एकूण ३१० घरे बाधित होत आहेत.

(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

वांद्रे पूर्व येथील प्रभाग क्रमांक ९६ या विभागात मल:निस्सारण वाहिनी अस्तित्वात नसल्याबाबत

(६) २६६१ (०१-०५-२०२५). श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे पूर्व मधील नवपाडा,घास बाझार, बेहराम पाडा, खेरवाडी रोड या विभागात मल:निस्सारण वाहिनी अस्तित्वात नसल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त परिसर हा दाट वस्तीचा भाग असून याठिकाणी प्रचंड घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असल्याने दुर्गधी पसरुन रोगराई निर्माण झालेली आहे ,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या विभागात लगत असलेली मल:निस्सारण वाहिनी अर्धवट असून वाहिनी घास बाजार गेट नं १८ पर्यंत विस्तारीत करावी व नवपाडा , घास बाझार, बेहराम पाडा, खेरवाडी रोड ,शौचालयाच्या लाईन या मल:निस्सारण वाहिनीस जोडण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२४-०९-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे. सदर ठिकाणी विविध व्यासाच्या मल:निसारण वाहिन्या अंशत: अस्तित्वात आहेत.
(२) हे खरे नाही. सदर ठिकाणी २३० मी.मी. व्यासाची मलनि:सारण वाहिनी काही भागात अस्तित्वात असुन सद्यस्थितीत नवपाडा रोड व खेरवाडी रोड येथे मलनि:सारण वाहिनी भरुन वाहत असल्याचे आढळून आले नाही.
(३) घासबाजार रोड येथे २३० मी.मी. व्यासाची मलनि:सारण वाहिनी अस्तित्वात आहे. तथापि ती मलनि:सारण वाहिनी गेट नंबर १८ पर्यंत करणेसाठी संबंधीत विभागांचे अभिप्राय घेऊन काम हाती घेण्याचे प्रस्तावित आहे.
सदर ठिकाणी मलनि:सारण वाहिनीचे काम करण्याबाबत, मूळ जमिन मालक पश्चिम रेल्वे यांची ना हरकत मिळणेबाबत, दि.१२.०३.२०२५ पत्रव्यवहार करण्यात आला आहे. पश्चिम रेल्वे प्राधिकरणाशी सदर बाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबई उपनगर जिल्हा तसेच मुंबई शहरातील मुंबई महापालिकेची प्रमुख रुग्णालयात व उपनगर रुग्णालयातील पदे रिक्त असल्याबाबत

(७) २८३८ (२४-०४-२०२५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर जिल्हा तसेच मुंबई शहरातील मुंबई महापालिकेची प्रमुख रुग्णालयात व उपनगर रुग्णालयातील असंख्य पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढत असून त्यातून कर्मचाऱ्यांच्या गैरहजेरीचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महापालिकेच्या मुख्य आणि उपनगरीय रुग्णालयांवर लाखो सर्वसामान्य नागरिक आरोग्य सुविधांसाठी अवलंबून असतात मात्र रुग्णालयातील रिक्त पदांमुळे सर्वसामान्य नागरिकांना योग्य व वेळेवर आरोग्य सुविधा मिळत नसल्याने शासनाने रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२४-०९-२०२५) : (१) होय, हे अंशतः खरे आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयामधील एकूण ३१७३२ पदांपैकी १०४३३ पदे रिक्त आहेत.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालयात व उपनगर रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. रिक्त पदांमुळे कर्मचा-यांवर कामाचा ताण वाढू नये म्हणून पदे कंत्राटी तत्वावर भरण्यात आली आहेत. सदर नियमित तसेच कंत्राटी पद्धतीने पदे बृहन्मुंबई महानरपालिकेने निश्चित केलेल्या अर्हतेनुसार भरली जातात. सद्यस्थितीत नियमित तसेच कंत्राटी निम्नवैद्यकीय संवर्गातील मनुष्यबळ उपलब्ध असल्यामुळे आरोग्य यंत्रणेवर ताण येत नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या गैरहजेरीचे प्रमाण अत्यल्प आहे.

(३) महानगरपालिकेच्या मुख्य आणि उपनगरीय रुग्णालयांमध्ये पदभरती ही सरळसेवा, पदोन्नती व अंतर्गत निवड पद्धतीने केली जाते. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांतील वैद्यकीय अधिकारी, सहाय्यक कर्मचारी वर्गाची नियमित तत्वावरील पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु असून रुग्णालयांचे कामकाज सुरळीत राहण्यासाठी व मुंबईकरांना उत्कृष्ट सेवा देण्याकरीता आवश्यकतेनुसार सक्षम अधिकाऱ्यांच्या मंजूरीने नियमित पदे भरेपर्यंत कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात रिक्त पदे भरण्यात येत आहेत. जेणेकरुन रुग्णालयीन कामकाज सुरळीत सुरु राहील. पदोन्नती व अंतर्गत निवड पद्धतीने केल्या जाणा-या पदभरती करिता योग्य ती कार्यवाही सुरु आहे. यास्तव महानगरपालिकेद्वारे नागरिकांना देण्यात येणा-या सेवांवर परिणाम झाल्याचे निदर्शनास येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या सीबीएससी शाळांत वाढ करण्याबाबत

(८) २९०७ (२७-०४-२०२५). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका मार्फत गरीब व कष्टकरी वर्गातील मुलांना इंग्रजी शिक्षण देण्याच्या दृष्टीने २०२१ पासून आपल्या शाळांचे मुंबई पब्लिक स्कूल असे रूपांतर करत त्याचे सीबीएससी सह इंग्रजी अभ्यासक्रम शिकवण्याचा निर्णय घेतला असून आतापर्यंत सीबीएससी बोर्डाच्या एकूण १८ शाळा मुंबई व मुंबई उपनगरात कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळांमध्ये गत वर्षात दहा हजार ३२७ विद्यार्थ्यांनी नर्सरी ते सहावी दरम्यान प्रवेश घेतला असल्याने शाळांची वाढती मागणी बघून यावर्षी मुंबई उपनगरात एक आणि शहरात एक अशा सीबीसीच्या दोन शाळा वाढवण्याचा पालिकेचा मानस आहे, हे ही खरे आहे का

(३) असल्यास याबाबत शासनाने चौकशी करुन पालकांची वाढती मागणी बघून सीबीएससी च्या शाळा वाढवण्याकरिता महानगरपालिकेमार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे

सन २०२१ पासून महानगरपालिकेच्या सर्व माध्यमाच्या शाळांचे मुंबई पब्लिक स्कूल असे संबोधण्यात आले. आत्तापर्यंत सीबीएसई बोर्डाच्या एकूण १८ शाळा मुंबई व मुंबई उपनगरात कार्यरत आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) सन २०२०-२१ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सीबीएएसई मंडळाची एक व आयसीएसई मंडळाची एक अशा ०२ शाळा सुरु करण्यात आल्या. तदनंतर,पालकांची तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार सन २०२१-२२ मध्ये सीबीएसई मंडळाच्या आणखी १० शाळा, सन २०२२-२३ मध्ये आयजीसीएसई ०१ व आयबी मंडळाची ०१, सन २०२३-२४ मध्ये सीबीएसई मंडळाच्या ०३ तद्नंतर सन २०२४-२५ मध्ये सीबीएसई मंडळाच्या ०४ शाळा सुरु करण्यात आल्या. अशा प्रकारे सीबीएसई मंडळाच्या १८, आयसीएसई ०१, आयबी ०१ व आयजीसीएसई

०१ अशा एकूण २१ शाळा सुरु आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील महिलांच्या सुरक्षेसाठी ॲप विकसित करण्याबाबत

(९) २९२३ (०१-०५-२०२५). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील महिलांच्या सुरक्षिततेसाठी महानगरपालिकेच्या वतीने मोबाईलद्वारे महिला सुरक्षा ॲप विकसित करण्यात येणार असून महानगरपालिकेने सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात १०० कोटींची तरतूद करण्याची घोषणा तत्कालीन आयुक्तांनी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईत होणाऱ्या महिला आणि तरुणींवर अत्याचार हल्ले छेडछाडीच्या घटनांमुळे राज्य सरकारने पालिकेला महिला सुरक्षा मोबाईल ॲप विकसित करण्याचे निर्देश दिले होते, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यासाठी अर्थसंकल्पात १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असतांनाही आजमितीपर्यंत महानगरपालिकेच्या आयटी विभागाने सदर ॲप विकसीत केलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने महिलांच्या सुरक्षेसाठी ॲप विकसित करण्यास टाळाटाळ करणा-यांवर संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१८-०९-२०२५) : (१) हे खरे आहे.
बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २०२४-२५ च्या महसुली अर्थसंकल्पामध्ये संचालक (नियोजन) या खात्यांतर्गत मुंबई महिला सुरक्षा अभियान या लेखाशिर्षामध्ये रु.१०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
सदर बाबत विविध राज्यांच्या जसे तामिळनाडू, पंजाब अशा राज्यांमध्ये महिला सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून कार्यरत असलेल्या ॲप बाबतची माहिती घेण्यात येत आहे. तेथील ॲपमध्ये अंतर्भूत असलेल्या बाबींचा अभ्यास करण्यात येत आहे. या ॲपमध्ये कोणत्या गोष्टींचा समावेश असावा, याबाबत विविध सामाजिक संस्थांसमवेत सल्लामसलत करण्यात येत आहे. तसेच सदर बाबत मुंबई पोलिस, महाराष्ट्र शासन यांच्याकडे कार्यरत असलेल्या ॲपबाबतची माहिती घेउन आवश्यक असलेल्या बाबी विचारात घेउन त्यानुसार ॲपमध्ये त्या समाविष्ट करण्यात येणार आहे. सद्यस्थितीत ॲप तयार करण्याची प्रक्रीया सुरू आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

स्वच्छता अभियान अंतर्गत महानगरपालिकेने विविध साहित्य व साधनांवर केलेला अतिरिक्त खर्च

(१०) २९३० (०१-०५-२०२५). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील धूळ नियंत्रण आणि प्रदूषण कमी करण्यासाठी व सखोल स्वच्छता अभियानासाठी खरेदी केलेल्या विविध साहित्य साधनांवर महानगरपालिकेने वर्षभरात सुमारे ५०० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेने गेल्या वर्षभरात सखोल स्वच्छता मोहिमे अंतर्गत पाण्याचे टँकर भाडेतत्त्वावर घेणे दूर कमी करण्यासाठी मिस्टिंग मशीन ची खरेदी यांत्रिकी झाडू खरेदी करणे किंवा भाडेतत्त्वावर घेण्यासह इतर सामग्री साठी

सुमारे ५०० कोटी रुपयांचा खर्च केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेने २३ हजार २७७ किलोमीटर पेक्षा जास्त लांबीचे रस्ते धुतले असून पाण्याच्या टँकरच्या कंत्राटावर चार कोटीचा खर्च करण्यात येऊन देखील मुबईतील धुळीचे प्रदूषण अद्यापही जैसे थे असल्याचे दिसून येत आहे, हेही खरे आहेकाय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईतील धुळीचे प्रदूषण कमी करण्याच्यादृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) हे अशंत: खरे आहे.

मुंबई महानगरपालिकेने मुंबईतील धुळ नियंत्रण करण्यासाठी मागील वर्षात ९ इलेक्ट्रिक यांत्रिकी झाडूची खरेदी केली आहे. त्यांची एकूण किंमत रु.२०.९२ कोटी आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे सखोल स्वच्छता मोहिम अंतर्गत गेल्या वर्षी एकूण रु.५०.८३ कोटी खर्च करण्यात आले आहेत.

(२) मुंबई महानगरपालिकेने गेल्या वर्षभरात सखोल स्वच्छता मोहिमे अंतर्गत कोणतीही यंत्र सामग्री खरेदी केलेली नाही. तथापि सखोल स्वच्छता मोहिमेसाठी घनकचरा विभागात उपलब्ध असलेल्या यांत्रिकी झाडूचा उपयोग या मोहिमे अंतर्गत करण्यात आला आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व विभागांमध्ये वायु प्रदूषण कमी करण्यासाठी धुळीची समस्या दूर करण्यासाठी मोबाईल मिस्टिंग युनिट' वाहनांची भाडेतत्त्वावर पुरवण्याबाबतची पहिली सेवा दि.१६-११-२०२३ रोजी सुरु करण्यात आली. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व २४ विभागांमध्ये वायु प्रदूषण कमी करण्यासाठी धुळीची समस्या दूर करण्यासाठी २५ मोबाईल मिस्टिंग युनिट वाहने भाडेतत्वावर घेण्यात आल्या. दि.१६.११.२०२३ ते दि.२८-०२-२०२५ या कालावधीचा एकूण खर्च रु.४ कोटी ६ लक्ष ५२ हजार इतका आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) वायू प्रदुषणाची पातळी नियंत्रणात आणण्यासाठी आणि प्रदूषणकारी घटकांना अटकाव करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने 'मुंबई वायु प्रदूषण शमन योजना-२०२३ प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. तसेच, वायु प्रदूषण नियंत्रणाकरिता बांधकाम कंत्राटदार, बांधकाम व्यावसायिक, विकासक, महापालिका अधिकारी व विभाग स्तरावरील अधिकारी यांनी करावयाच्या उपाययोजनासंबंधी २७ मुद्यांचे सर्वकष मार्गदर्शक तत्वे दिनांक २५.१०.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आलेली आहेत. तसेच,दि.१५.१०.२०२४ रोजी सुधारित २८ मुद्यांचे सर्वकष मार्गदर्शक तत्वे' निर्गमित करण्यात आल्या. यामध्ये बांधकाम प्रकल्पाच्या सभोवताली धूळप्रदूषण रोखण्याकरिता पत्र्यांचे कुंपण उभारणे, हिरव्या कपडयांचे आच्छादन करणे, पाणी-फवारणी करणे, राडारोडयाची शास्त्रशुध्द साठवण व ने-आण करणे, बांधकामाच्या ठिकाणी वायू-प्रदूषण मोजमाप करणारी यंत्रणा बसविणे, धूरशोषक यंत्रे बसविणे व इतर महत्वाच्या उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत.

सदर सर्वकष मार्गदर्शक तत्वांमध्ये नमुद उपाययोजनांची अंमलबजावणी होणेकरिता विभाग स्तरावर भरारी पथके स्थापन करण्यात आलेली आहेत व भरारी पथकांकडून मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करणा-यांविरुध्द कारवाई करण्यात येत आहे.

रस्त्यावरील धूळ आटोक्यात आणण्यासाठी ५ हजार लीटर क्षमतेचे ६७ टँकर्स आणि ९ हजार लीटर क्षमतेचे ३९ टँकर्स दररोज वापरात आहेत. प्रत्येक विभागामध्ये दिवसभर दोन पाळयांमध्ये एकूण २५ मिस्टींग मशीनचा वापर करण्यात येत आहे.

सातत्याने २०० च्या वर वायु गुणवत्ता निर्देशांक गेल्यामुळे दि.३१.१२.२०२४ रोजी भायखळा व बोरिवली (पू) विभागातील पूर्ण क्षेत्रामध्ये GRAP ४ अंतर्गत बांधकामे थांबविण्यात आली होती.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या मोकळ्या जागा नाममात्र भाड्याने मक्ता करारावर दिले असल्याबाबत

(११) ३०४५ (२७-०४-२०२५). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या सुमारे ३६६८ मोकळ्या जागा कित्येक वर्षे नाममात्र भाड्याने मक्ता करारावर देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासन या जागा ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१९-०९-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सुमारे ३४७२ मोकळ्या जागा म्हणजेच रिक्त भूभाग हे मक्ता करारावर दिलेले नसून सदर रिक्त भूभाग हे भाडेतत्वावर देण्यात आलेले आहेत.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेने रिक्त भूभाग भाडेपट्ट्याचे अधिमूल्य आकारून रिक्त भूभाग हे मक्त्यामध्ये रूपांतरित करण्याचे धोरण दि.०३.०३.२०२५ व दि. २८.०४.२०२५ अन्वये पारित करण्यात आले.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

देवनार डम्पिंग ग्राउंड येथील वीजनिर्मिती प्रकल्पाबाबत

(१२) ३०६८ (२७-०४-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवनार डम्पिंग ग्राउंडमधून आठ मेगावॅट वीजनिर्मिती प्रकल्पास मंजुरी मिळण्याकरिता मुंबई महानगरपालिकेने केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवला असल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने देवनार डंपिग ग्राउंड मधील आठ मेगावॅट वीजनिर्मिती प्रकल्पास कचऱ्याच्या दर्जामुळे मान्यता दिली नसुन चार मेगावॅट वीजनिर्मिती प्रकल्पास मंजुरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंजुरी देण्यात आलेला चार मेगावॅट प्रकल्प सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.

देवनार क्षेपणभूमी येथे सुमारे ६०० मे टन कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारण्यात येत असून प्रकल्पाच्या निविदा अटी व शर्तीनुसार सदर प्रकल्पामधून ८ मेगावॅट वीजनिर्मिती शक्य आहे. सद्यस्थितीत प्रकल्प उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सद्यस्थितीत प्रकल्प उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील केईएम रुग्णालयातील वैदयकिय महाविदयालयात प्राध्यापकांची पदे रिक्त असल्याबाबत

(१३) ३०९६ (२७-०४-२०२५). श्री.सुनील राऊत (विक्रोळी), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील केईएम रुग्णालयातील वैदयकिय महाविदयालयात प्राध्यापकांचीच १६० पदे रिक्त असल्याचे नुकतेच माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालयात ४० टक्के पदे रिक्त असल्याने कामाचा आणि रुग्णांचा अतिरिक्त भार इतर कर्मचाऱ्यावर येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वैदयकिय महाविदलयासाठी वैदयकिय अधिका-यांची दोन पदे मंजूर करण्यात आली असूनही दोन्ही पदे अदयापही रिक्त आहेत तसेच वसतिगृह अधिक्षकांच्या मंजूर तीन पदांपैकी एकाही पदावर नियुक्ती झालेली नाही ,लॅब असिस्टंटच्या ३३ मंजूर पदांपैकी सर्व पदे रिक्त आहेत, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) अंशत: खरे आहे.
(२) रुग्णालयातील कामाचा आणि रुग्णांचा अतिरीक्त भार इतर कर्मचा-यांवर येऊ नये म्हणून वेळोवेळी रिक्त असलेली सहाय्यक प्राध्यापकांची पदे कंत्राटी तत्वावर भरण्यात येतात.
(३) सेठ गो. सु. वैद्यकीय महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील दोन वैद्यकीय अधिका-यांची पदे कंत्राट तत्वावर भरण्यात आली होती, तथापि, राजीनामा दिल्यामुळे दोनही पदे रिक्त आहेत. सदर पदे कंत्राटी तत्वावर भरण्याची कार्यवाही सुरु आहे. वसतिगृह अधिक्षकांची मंजुर तीनही पदे भरण्यात आलेली आहेत. सेठ गो. सुं. वैद्यकीय महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील लॅब असिस्टंटची ३३ पदे रिक्त आहेत.
(४) महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयातील व प्रमुख रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याकरीता आवश्यक असल्याप्रमाणे अर्हता अद्ययावत करणे, दिव्यांग पद सुनिश्चिती करणे व बिंदुनामावली पडताळणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील शताब्दी व कस्तुरबा रुग्णालयात चतुर्थश्रेणी कर्मचारी रुग्णांचे इसीजी काढत असल्याबाबत

(१४) ३३९२ (०१-०५-२०२५). श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या गोवंडी येथील शताब्दी रुग्णालयात चतुर्थ श्रेणी कर्मचारी अनेक महिन्यापासून रुग्णांचे इसीजी काढत असल्याचे प्रकार माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयामधील सदर गंभीर प्रकार समोर आला असून सर्वसामान्यांना मधून प्रचंड संताप व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच मुंबई स्थित कस्तुरबा रुग्णालयाच्या बर्न ओटीमध्ये भाजलेल्या रुग्णांची मलमपट्टी चक्क कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२५ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर रुग्णालय प्रशासनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, तसेच या रुग्णालयातील ईसीजी टेक्निशियन चे पद तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (१८-०९-२०२५) : (१) हे अंशतः खरे आहे.

बाह्य रुग्ण, तात्काळ विभाग व इतर ठिकाणी उपचारासाठी लागणरे सर्व विद्युत हृदय आलेख (ECG) डॉक्टरच काढतात. परंतू शस्त्रक्रीया व इतर fitness साठी येणा-या रुग्णांचे विद्युत हृदय आलेख (ECG) लागतात ते या प्रशिक्षित

कर्मचाऱ्यांमार्फत डॉक्टरांच्या पर्यवेक्षणाखाली काढले जातात. या विद्युत हृदय आलेख (ECG) चा रिपोर्ट डॉक्टर fitness देताना तपासतात.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

कस्तुरबा रूग्णालयाच्या बर्न ओटीमध्ये भाजलेल्या रूग्णांची मलमपट्टी, कक्षात नेमलेल्या परिचारीका व चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या मदतीने डॉक्टरांकडून केली जाते.
(४) प्रश्न उद्धवत नाही.
(५) ईसीजी टेक्निशियन हे पद भरण्यासाठी प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली असुन पदे भरण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील कुर्ला येथे झालेल्या बस अपघाताबाबत

(१५) ३४३० (०१-०५-२०२५). श्री.संजय मेश्राम (उमरेड) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कुर्ला एलबीएस मार्गावर दि. ९ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या भीषण अपघाताची चौकशी आणि भरती प्रक्रिया, प्रशिक्षण आदींबाबत मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यासाठी बेस्ट उपक्रमाचे तत्कालीन महाव्यवस्थापक यांनी पाच सदस्य समिती नेमली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त समितीने तयार केलेला अहवाल आणि मार्गदर्शक तत्वे अद्यापर्यंत शासनास प्राप्त झाली नसल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये वात्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने कुर्ल्यातील अपघातानंतर बेस्ट उपक्रमाने अपघातामागील कारणे व त्यानंतर भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) होय हे खरे आहे.

मुंबईतील कुर्ला एलबीएस मार्गावर दि.०९ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या अपघाताची चौकशी करण्याकरीता मुख्य व्यवस्थापक (वाहतूक) यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यांची अपघात चौकशी समिती स्थापन करण्यात आली.
(२) हे खरे नाही.

बेस्ट उपक्रमाच्या अपघात चौकशी समितीने अपघाताबाबतचा अहवाल मा. अतिरिक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या कार्यालयात सादर केलेला आहे.
(३) चौकशीअंती संबंधितांवर कारवाई करण्यात आली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
सदर अपघात हा बसचालकाच्या निष्काळजीपणामुळे झाल्याचे निदर्शनास आले आहे.
भविष्यात होणारे अपघात टाळण्याकरीता बेस्ट व्यवस्थापनाद्वारे खालील उपाययोजना अंमलात आणल्या आहेत.

- बेस्ट उपक्रमाच्या स्वमालकीच्या तसेच भाडेतत्वावरील बसगाड्यांवर नियुक्त बसचालकांना २८ दिवसांचे वाहन चालन प्रशिक्षण देण्यात येत आहे.
- वाहतूक व अभियांत्रिकी विभागाच्या अधिका-यांच्या समन्वयाने मार्गावरील बस चालकांची वाहन चालन पध्दती तपासून त्या नुसार सदोष बसचालकांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येते.
- उपक्रमातील बस चालकांची तसेच भाडेतत्वावरील बसगाडयांवर नियुक्त बस चालकांची वेळोवेळी श्वास विश्लेषक तपासणी करण्यात येते.
- वाहतूक पोलिस व प्रादेशिक परिवहन विभाग यांच्या समन्वयाने वाहतूक नियमांचे पालन करण्यासंबंधी चालकांना समूपदेशन करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबईतील जुन्या मंदिराच्या संपादित केलेल्या जमिनींच्या बदल्यात शेतकऱ्यांना योजनेतला लाभ देण्याबाबत

(१६) ३५४१ (२७-०४-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील अनेक गावांच्या जमिनी सन १९८० मध्ये संपादित करून सिडकोने नवी मुंबई शहर विकसित केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावातील मंदिरांच्या नावावर असलेल्या जमिनीचा निर्णय सिडकोने अद्यापपर्यंत प्रलंबित ठेवलेला असताना आता अचानक नवी मुंबईतील जुन्या मंदिराच्या संपादित केलेल्या जमिनींच्या बदल्यात शेतकऱ्यांना १२.५ आणि २२.५% योजनेतला लाभ मिळवण्यासाठी पात्रता मंजूर करण्याचे आदेश राज्य शासनाने सिडको महामंडळाला माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्या अनुषंगाने सिडकोने पुढे कोणती कार्यवाही केली आहे व कुळांच्या नावाने निघणारे हे भूखंड कोणत्या प्रकल्पांसाठी वापरण्यात येणार आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२५) : (१) हे खरे आहे.

नवी मुंबई प्रकल्पासाठी सिडको महामंडळाची "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ११३(१) नुसार दि.२०.०३.१९७१ रोजीच्या अधिसूचनेन्वये "नवनगर विकास प्राधिकरण" म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नवी मुंबई प्रकल्पासाठी ठाणे व रायगड जिल्ह्यातील एकूण ९५ गावे अधिसूचित करण्यात आली आहेत. जिल्हाधिकारी, ठाणे व रायगड यांच्यामार्फत अधिसूचित क्षेत्रातील जमिनीच्या महसूल अधिकार अभिलेखाच्या गाव नमुना ७/१२ च्या इतर अधिकारात "नवी मुंबई प्रकल्पाकरीता भूसंपादनामध्ये समाविष्ट" अशा नोंदी घेण्यात आल्या आहेत. शासनाच्यावतीने सिडकोमार्फत जिल्हाधिकारी, ठाणे व रायगड यांच्या अधिनस्त नवी मुंबई प्रकल्पाकरीता अधिसूचित गावातील महसूल अभिलेखानुसार गावठाण क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्रातील खाजगी जमिनी भूमीसंपादन अधिनियम, १८९४ अन्वये संपादित करण्यात आल्या आहेत. सदर भूमीसंपादन अधिनियम, १८९४ हा दि. ३१.१२.२०१३ रोजी निरस्त झाला असून त्याऐवजी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ हा दि.१.१.२०१४ पासून अंमलात आला आहे. त्यानुसार नवी मुंबई प्रकल्पांअंतर्गत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई ट्रान्स हर्बर लिंक प्रकल्प, नेरुळ-उरण रेल्वे प्रकल्प व अनुषंगिक कामासाठी खाजगी जमिनी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत संपादित करण्यात आल्या आहेत. तसेच नगर विकास विभागाच्या शासन निर्णय, दि.२८.०२.२०१८ अन्वये सिडको महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व विकास प्रकल्पाकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ नुसार सिडको स्तरावर जमीन संपादन करण्यास मान्यता देण्यात आली असून सदर अधिनियमाखाली सिडकोस्तरावर जमीन संपादनाची कार्यवाही करण्यात येते.

(२) नवी मुंबई प्रकल्पासाठी खाजगी देवस्थाने जमिनीतील वहिवाटदार / कुळ यांना १२.५% योजनेअंतर्गत पात्र प्रकल्पग्रस्त ठरविण्यासाठी सिडको संचालक मंडळाने ठराव क्र.१०५९७, दि.२२.१२.२०११ पारित केला आहे. सदर ठरावास शासनाने दि.२६.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिलेली आहे. तसेच सदर ठरावातील अटी व शर्तीनुसार सर्व प्रकरणांची तपासणी करुन त्याबाबतची खातरजमा करण्यासाठी शासनास सादर करावीत, असे निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने सिडको संचालक मंडळाच्या दि.४.१२.२०२४ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. १३०१३ हा पारित केला असून शासनाच्या तसेच संचालक मंडळाच्या मान्यतेनुसार प्रकरणनिहाय पडताळणी करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) सिडको संचालक मंडळाच्या दि.४.१२.२०२४ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.१३०१३ हा पारित केला असून शासनाच्या तसेच संचालक मंडळाच्या मान्यतेनुसार प्रकरणनिहाय पडताळणी करण्याची कार्यवाही सिडको स्तरावर सुरू

आहे. सदर शासनपत्र तसेच सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्रमांक १०५९७ मधील जमिनी ह्या पात्र वहीवाटदार / कुळे यांना १२.५% योजनेंतर्गत विकसीत भूखंड रहिवासी व वाणिज्यीक वापरासाठी वाटप करण्यात येणार आहेत.

गोरेगाव खाडी पुलावर भगतसिंग नगर झोपडपट्टी परिसरातून पूल बांधण्याबाबत

(१७) ३५४२ (०१-०५-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम द्रुतगती मार्गावरील वाहत कोंडीचा प्रश्न सोडवण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने गोरेगाव खाडी पुलावर भगतसिंग नगर झोपडपट्टी परिसरातून पूल बांधण्याचा निर्णय सन २०२२ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पूलाच्या एका बाजूला मोठी झोपडपट्टी असून तब्बल २ हजार बांधकामे हटवावी लागणार असताना प्रकल्पाच्या कामासाठी भूसंपादन न करताच दोन वर्षापूर्वी महापालिका प्रशासनाने ३२५ कोटी रुपयाचे कंत्राट दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूसंपादन न करताच प्रकल्पाच्या कामाकरिता कंत्राट देण्याची कारणे काय आहेत तसेच सदर प्रकल्पाच्या कामास मंजुरी देऊन दोन वर्षे पूर्ण होऊनही अद्यापर्यंत कामास सुरवात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रकल्पाच्या कामास प्रारंभ होण्यास एवढा विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करून प्रकल्प सुरु करण्याबाबत काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

प्रस्तावित पुलाची उत्तरेकडील बाजू (पोहोच रस्ता सह) ३६.६० मी विकास नियोजन रस्ता मार्गरेषा लिंकरोड पर्यंत अतिक्रमित आहे. सदरहू मार्गरेषा ही विकसित झालेली नसून अंदाजे १६०० झोपड्या या ३६.६० मी. विकास नियोजन रस्ता मार्गरेषेने बाधित होत आहेत.

तथापि, सदरहू पुलाचा उत्तरे कडील पाया व पोहोच रस्तासह बांधकामामध्ये अंदाजे ५४० बांधकामे बाधित होत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याशी सदरहू पुलाच्या पायाच्या बांधकामामध्ये येणा-या झोपडीधारकांचे पूनर्वसन करण्याकरिता व पर्यायी जागेकरिता घरे उपलब्ध करुन देण्याकरीता पाठपुरावा करण्यात येत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर पुलाच्या बांधकामाकरिता सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने दि.०१.१२.२०२२ रोजी स्वीकृती पत्र तथा कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कंत्राट रक्कम ही रु. ४९९.२० कोटी इतकी आहे.

(३) व (४) सदर प्रकल्प हा किनारा नियंत्रण पट्टा कांदळवन उच्चतम भरती रेषा/ उच्चतम दाबाच्या विद्युत वाहिनी, इत्यादीनी बाधित होत असून त्याकरीता विविध ना-हरकत प्रमाणपत्रे व पर्यावरण परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच, आवश्यक त्या विविध परवानगी प्राप्त करण्याची जबाबदारी ही कंत्राटदारावर सोपविण्यात आली आहे. त्याअनुषंगाने, कंत्राटदाराने सदरहू परवानग्या या राज्य शासन व केंद्र शासन यांच्या अखत्यारीतील विविध विभागांशी पाठपुरावा करुन प्राप्त करण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA), पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय (MoEF&CC), केंद्र शासन, नवी दिल्ली, वन हक्क कायदा अंतर्गत वन विभाग यांच्याकडून प्रमाणपत्र (FRA) इत्यादी विविध परवानग्या प्राप्त केलेल्या आहेत. तसेच, मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये जनहीत याचिका क्र.८७ of २००६ च्या अनुषंगाने Writ Petition No. ५३१९ of २०२४ दाखल करण्यात आलेली होती. त्याबाबतची सुनावणी दि.०७.०५.२०२५ रोजी पूर्ण होऊन सदर परवानगी मा. उच्च न्यायालयाकडून प्राप्त झाली आहे. वन विभागाकडुन काम सुरु करण्यासाठीची परवानगी प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

"मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनेच्या" प्रसार तसेच योजना राबविण्याकरता खर्च मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आल्याबाबत

(१८) ३५४३ (०१-०५-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महायुती शासनाने सुरू केलेल्या "मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनेच्या" जाहिराती, मुंबईतील बस स्टॉप, रेल्वे स्थानक या ठिकाणी फ्लेक्स, होर्डिंग व डिजिटल बोर्डाच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या जाहिराती तसेच योजना राबविण्याकरता आवश्यक मनुष्यबळ आदीचा खर्च मुंबई महानगरपालिकेच्या मार्फत करण्यात आले असल्याचे माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेच्या अंमलबजावणीसाठी महापालिकेच्या १५ सहायक आयुक्तांना कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येऊन प्रत्येक वार्डात योजनेचे अर्ज भरण्यासाठी सुरू केलेल्या केंद्रावर या योजनेच्या कामासाठी स्वतंत्र मनुष्यबळ तैनात ठेवण्याचे तसेच त्यांच्या निवारा, पिण्याच्या पाण्याचे सुविधा पुरविण्याच्या सूचना देण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर केंद्राच्या कामकाजावर देखरेखीची जबाबदारी पालिकेच्या विभाग अधिकाऱ्यांना देण्यात आली असून त्यासाठी येणारा आवश्यक खर्च देखील वॉर्ड स्तरावर करण्याच्या सूचना देण्यात आले होत्या, हे ही खरी आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाच्या योजनेचा खर्च महापालिकेमार्फत करण्याची कारणे काय आहेत, तसेच , सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती राज्य शासन महापालिकेस करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१८-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.

सदर बाबतचा खर्च जिल्हाधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर यांच्या मार्फत करण्यात आलेला आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

सदर बाबतीत महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत शासन निर्णय जारी करण्यात आला होता. त्या अन्वये महानगरपालिका स्तरावर त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. महानगरपालिकेद्वारे केवळ अंगणवाडी सेविका यांना अर्ज भरण्याकरीता विभागस्तरावर जागा उपलब्ध करून देण्यात आलेली होती.

सदर बाबतची सर्व देयके जिल्हाधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर यांना सादर करण्यात आलेली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील बेस्ट उपक्रमाच्या मालकीच्या बसेस खरेदी व रिक्त पदे भरण्याबाबत

(१९) ३५४६ (२४-०४-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बेस्ट उपक्रमातील तब्बल २१६० बसेस गेल्या ५ वर्षात आयुर्मान संपुष्टात आल्याने भंगारात काढल्या आतापर्यंत केवळ ३७ नवीन बसगाड्या घेण्यात आल्या असून सदर नवीन बसेस अद्यापही सेवेत आलेल्या नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेस्टच्या मालकीच्या माहे ऑगस्ट, २०२४ पर्यंत केवळ १०६१ बसेस असून २१२६ बसगाड्या भाडेतत्वावर घेतल्या आहेत, या बसेसची देखभाल-दुरुस्ती वेळेत होत नसल्याने प्रवासादरम्यान प्रवाशांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच ४४ हजार कर्मचारी असलेल्या बेस्टमध्ये सध्या केवळ २२ हजार कर्मचारी कार्यरत असून निवृत्त झाल्यानंतर

रिक्त होणा-या जागा अद्यापही भरण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन मुंबईतील बेस्ट उपक्रमाच्या मालकीच्या नवीन बसेस उपलब्ध करण्याबाबत तसेच रिक्त असलेली कर्मचा-यांची पदे भरण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) हे खरे नाही,

गेल्या ५ वर्षात बेस्ट उपक्रमातील २०५६ बसेस आयुर्मान संपुष्टात आल्याने भंगारात काढलेल्या आहेत. तसेच जानेवारी २०२० पासून तेजस्विनी योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या ३७ बसगाड्या बेस्ट उपक्रमाद्वारे प्रवाशी सेवेत समाविष्ट केलेल्या आहेत.
(२) बेस्टच्या मालकीच्या माहे ऑगस्ट, २०२४ पर्यंत केवळ १०६१ बसेस असून २१२६ बसगाडया भाडेतत्वावर घेतल्या आहेत. बेस्ट उपक्रमास बस पुरवठा करणाऱ्या कंत्राटदार बस निर्माण करणाऱ्या कंपनीच्या मार्गदर्शन तत्वानुसार बस गाड्यांची दुरुस्ती व देखभाल करत असतात. कंत्राटदार बसगाड्यांची योग्यरित्या देखभाल दुरुस्ती करत आहेत याची खात्री करण्यासाठी बेस्टचे अधिकारी वेळोवेळी आकस्मित तपासणी करतात.
(३) एप्रिल २०२२ रोजी बेस्ट उपक्रमाच्या सेवकवर्गाची निकड व शासनाने पदोन्नतीबाबत दिलेले निर्देश हया सर्व बाबी घेऊन तत्कालीन महाव्यवस्थापकांच्या परवानगीने, उपक्रमातील अत्यावश्यक अधिकारी पदांकरिता पदोन्नती प्रक्रिया राबवण्यात आली.

दिनांक १४ मार्च २०२४ रोजी मा. महानगरपालिका आयुक्तांच्या दालनात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने विद्युत पुरवठा विभागामध्ये "सरळसेवा भरती" प्रक्रियेस मान्यता देण्यात आली आहे. बेस्ट उपक्रमात एकूण २५,३४६ कर्मचारी कार्यरत आहेत.
(४) मुंबईतील बेस्ट उपक्रमाच्या मालकीच्या नवीन बसेस खरेदी करण्यासाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून बृहन्मुंबई महानगर पालिकेकडे पाठपुरावा सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महापालिकेच्या केईएम रुग्णालयाच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

(२०) ३५४८ (०१-०५-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यासह देशभरातील गोर-गरीब रुग्ण मुंबई महापालिकेच्या केईएम रुग्णालयात येत असून सदर रुग्णालयाच्या आवारातील उज-१, उज-२, उज-३ आणि भांडारगृह अशा चार जुन्या इमारती पाडून तेथील सुमारे ४ हजार चौ.मी. जागेवर हॉस्पटलची नवीन तंत्रज्ञान, अद्ययावत उपकरणांसह ३०० बेड व २२ ऑपरेशन थिएटरसह ३२ मजली इमारत बांधण्यासाठी महापालिकेच्या वास्तुविशारद विभागार्माफत आराखडा तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आराखड्यास प्रशासकीय मान्यता मिळालेली नसल्याने हॉस्पिटलच्या पुनर्विकासाचा प्रश्न प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन केईएम रुग्णालयाच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) अंशत: खरे आहे.

रा.ए.स्मा.रुग्णालयाच्या सद्यस्थितीतील काही जुन्या व जीर्ण अवस्थेतील इमारती पाडून त्या जागी नवीन बहुमजली अशी "आयुष्यमान शताब्दी टॉवर" या इमारतीच्या उभारणी करीताच्या प्रस्तावाला मा. महानगरपालिका आयुक्त यांची क्र. एमजीसी/एफ/५७३८ दि. १०.०३.२०२५ अन्वये तत्वतः प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे. तत्पश्चात सदर इमारतीचा आराखडा तयार करण्याकरीता सदर प्रस्ताव महानगरपालिकेच्या वास्तूशास्त्रज्ञ विभागास क्र.

केईएम/१००२८/जी-।। दि.१८.०३.२०२५ रोजी पाठविण्यात आलेला आहे. आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

सदर रा.ए.स्मा.रुग्णालयाच्या आवारातील "आयुष्यमान शताब्दी टॉवर" या बहुमजली इमारतीच्या उभारणीकरीताच्या प्रस्तावाला मा. महानगरपालिका आयुक्त यांची क्र. एमजीसी/एफ/५७३८ दि. १०.०३.२०२५ अन्वये तत्वतः प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे. तथापि अंतिम आराखडा तयार करण्याची प्रक्रिया वास्तुशास्त्र विभागामार्फत पुर्ण झाल्यावर सदर अंतिम आराखडयास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेण्यात येईल.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मानखुर्द शिवाजीनगर येथे लल्लुभाई कंपाउंड मधील शासकीस रूग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी कोणतीच व्यवस्था नसल्याबाबत

(२१) ३६६३ (०१-०५-२०२५). श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द शिवाजीनगर येथे लल्लुभाई कंपाउंड मधील शासकीस रूग्णालयासाठी इमारत पूर्णपणे बनून तयार असून वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी कोणतीच व्यवस्था नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, मानखुर्द, गोवंडी, विभागात मोठे रूग्णालय नसल्याने स्थानिक नागरिकांना उपचाराकरिता दूरवर उपचारासाठी जावे लागत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, रूग्णालयासाठी सज्ज असलेली इमारत त्वरीत मनपास हस्तांतरित करून या ठिकाणी रूग्णालयीन सेवा पुरविण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतीनिधी व नागरीकांमार्फत करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकणी शासनाने चौकशी करुन रुग्णालयांची इमारत मनपास हस्तांतरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सद्यस्थितीत मानखुर्द, गोवंडी नजीक असलेल्या पंडीत मदनमोहन मालवीय रुग्णालय, शताब्दी गोवंडी येथे एकुण रुग्णशय्या २१० व पुर्नविकासानंतर एकुण ५८० रुग्णशय्या कार्यरत होणार आहे. तसेच राजावाडी रुग्णालय, घाटकोपर येथे ५९६ रुग्णशय्या असलेले रुग्णालय कार्यरत असून पुर्नविकास आराखड्यानूसार प्रस्तावित रुग्णशय्या १०२० कार्यरत होतील. पुर्व उपनगरात एम (पूर्व) आणि एम (पश्चिम) परिसरात ४ प्रसुती गृहे शहाजीनगर प्रसुतीगृह, चीता कॅम्प, देवनार प्रसुती गृह, शिवाजीनगर प्रसूतीगृह, मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसूतीगृह, चेंबूर नाका कार्यरत आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) सदर रुग्णालयाची इमारत माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरित करुन घेण्यात आली आहे. सदर रुग्णालय इमारत सार्वजनिक खाजगी प्रकल्पाअंतर्गत जसे आहे तसे चालविण्यास देण्यासाठी निविदाप्रक्रिया सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अणुशक्ती नगर,मुंबई येथे विकास आराखडा-२०३४ मध्ये विविध राखीव जागांचा विकास करण्याबाबत

(२२) ४०५३ (२३-०४-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील अणुशक्ती नगर मतदार संघात विकास आराखडा,-२०३४ अंतर्गत शाळा,रुग्णालये, बागा,स्मशानभुमती,मैदान,बाजारपेठ,क्रिडा संकुल,कार्यरत महिला वसतिगृह,कौशल्य विकास केंद्रे, नाटक थिएटर इत्यादिंसाठी राखीव केलेल्या किती जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (BMC) ताब्यात आणि मालकीच्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक आजी-माजी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकाच्या अनुषंगाने आरक्षित भूखंडांच्या विकास करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC) या राखीव जागांना त्याच्या उद्देशानुसार आणि सार्वजनिक लाभासाठी विकसित करीत नसल्यामुळे त्या जागांवर होणारे अतिक्रमण रोखण्यासाठी व निष्कासित करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) अणुशक्ती नगर मतदार संघात प्रारूप आराखडा २०३४ प्रकाशित झाल्यापासून (सन २०१५ पासून) एकूण ३८ भूखंड विकास नियोजन विभागाने संपादित केले आहेत.
(२) स्थानिक आजी माजी लोकप्रतिनिधी, स्थानिक रहिवाश्यांकडून प्राप्त विनंती व आवश्यकतेनुसार विकास नियोजन आराखडा- २०३४ मध्ये आरक्षित असलेली व महानगरपालिकेच्या ताब्यात असलेली आरक्षीत जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून विकसित करण्यात येतात.
(३) विकास नियोजन आराखडा - २०३४ नुसार आरक्षित असलेली व महानगरपालीकेच्या ताब्यात असलेली आरक्षित जागा ही महानगरपालिकेमार्फत संरक्षक भिंत बांधुन सीमांकीत व संरक्षित केली जातात. सदर महानगरपालिकेच्या ताब्यातील आरक्षित जागेवर होणारे अतिक्रमण या विभागामार्फत वेळोवेळी निष्कासित केली जातात. महानगरपालिकेमार्फत सदर ठिकाणे ही निरिक्षणाखाली ठेवली जातात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दतील सन २०१५ पुर्वी जन्म झालेला व्यक्तीच्या जन्म प्रमाणपत्रावर बारकोड सुविधा उपलब्ध नसल्याबाबत

(२३) ४०७६ (०१-०५-२०२५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दतील सन २०१५ पुर्वी एखाद्या मुला-मुलीचा जन्म झालेला असेल तर त्यांचे जन्म प्रमाणपत्रावर बारकोड सुविधा उपलब्ध नसल्याचे माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जन्म प्रमाणपत्रावर बारकोड सुविधा उपलब्ध नसल्याने पासपोर्ट व इतर ओळखपत्र तयार करताना नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सन २०१५ पुर्वी जन्म झालेल्या मुला-मुलीच्या जन्म प्रमाणपत्रावर बारकोड सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) हे खरे नाही,
सन २०१६ पुर्वी बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये जन्मलेल्या बालकांची नोंद सॅप (SAP) प्रणाली मध्ये घेण्यात येत होती. सदर प्रणालीमध्ये बारकोड ची सुविधा उपलब्ध नव्हती. तथापि सन २०१६ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने जन्म मृत्यु नोंदणीकरीता केंद्रशासनाच्या निर्देशानुसार CRS (Civil Registration System) प्रणालीचा अवलंब केला असुन सदर प्रणालीमध्ये बारकोडची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. केंद्रशासनाने निर्देशित केलेल्या CRS प्रणालीमध्ये

सन २०१६ पुर्वी जन्मलेल्या बालकांच्या नोंदी अद्यावत करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. जेणेकरून नागरिकांना बारकोड सहित प्रमाणपत्र सहज प्राप्त करता येते.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील गोवंडी स्टेशनच्या परिसरात वळणरस्ता तयार करणेबाबत

(२४) ४१७१ (०१-०५-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील गोवंडी रेल्वे स्टेशन परिसरात वळण रस्ता तयार करण्याबाबत माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान तत्कालीन अल्पसंख्याक मंत्री यांनी आयुक्त बृहन्मुंबई महानगर पालिका व इतर अधिकारी यांच्याबरोबर झालेल्या पाहणी बैठकीत सदर रस्ता तयार करण्यास मान्य देण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता तात्काळ होणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधीत अधिकाऱ्यांकडे ४-५ वेळा बैठका घेऊनही अद्याप मंजुरी प्राप्त झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त परिसरातील असलेले अरुंद रस्ते, वाढलेली वाहतुक व होणारे अपघात लक्षात घेता हा रस्ता तात्काळ मंजुर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) गोवंडी स्थानक पूर्व व टाटा नगर रस्ता (देवनार कत्तलखाना लगतचा रस्ता) यांमधील भूभाग सद्यस्थितीत झोपडयांने भारग्रस्त असून अशा ठिकाणी तत्कालीन अल्पसंख्याक मंत्री व अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) यांनी माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये एकत्रित स्थळपाहणी करुन गोवंडी स्थानक पूर्व पासून टाटा नगर रस्त्याला दोन ठिकाणी जोडणारा १८.३० मी. रुंदीचा नवीन वळण रस्ता बनविण्याचे निर्देश दिले होते.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून नियमित रस्ता रेषा विहित करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
(३) गोवंडी स्थानका बाहेर टाटा नगर रस्त्याला जोडणाऱ्या नविन प्रस्तावित वळण रस्त्याला बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम २९१ (अ) सह वाचावयाचे कलम २९४ अन्वये १८.३० मी. रुंदीची वाहतूकीसाठी रस्ता रेषा व पादचाऱ्यांकरीता ९.१५ मी. रुंदीची रस्ता रेषा प्रस्तावित करण्याचा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीकरीता दि.०२.०९.२०२४ अन्वये आयुक्तांकडे सादर करण्यात आलेला आहे.
जमिनीच्या मालकीबाबत निश्चित माहिती नसल्याने प्रमुख अभियंता (विकास नियोजन) विभागामार्फत नगर भूमापन अधिकारी घाटकोपर यांच्याकडे जमिनीच्या मालकीबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे.
या संदर्भात निवासी उप जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी सदर जागेचा न.भू. क्र.७८९, बोर्ला गाव असून, मिळकत पत्रिकेनुसार सदर जागेची मालकी टाटा पॉवर कंपनीची आहे असे कळविले आहे. त्यानुसार सदर माहिती मुळ प्रस्तावात समाविष्ट करुन सदर जागेवर वळण रस्ता बनविण्याचा मुळ प्रस्ताव दि.०२.०५.२००५ अन्वये पुन्हा सक्षम प्राधिकरणाकडे मंजूरीकरीता सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही..

मुंबई शहरात मलनि:सारण सुविधा नसल्यामुळे मलमूत्रयुक्त सांडपाणी थेट नदी नाल्यांमध्ये सोडण्यात येत असल्याबाबत

(२५) ४२४६ (०१-०५-२०२५). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील सुमारे २२.२० टक्के भागात मलनि:सारण सुविधा नसल्यामुळे मलमूत्रयुक्त सांडपाणी थेट नदी – नाल्यांमध्ये सोडण्यात येत असल्याने या परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरून प्रदूषणामध्ये वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२३ च्या स्वच्छ सर्वेक्षण अभियानात मुंबईचा क्रमांक पहिल्या पन्नास स्वच्छ शहरामध्येही नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई शहर व उपनगरात पाच ते सहा वर्षात १०० टक्के मलनि:सारण सुविधा उपलब्ध असेल असे महानगरपालिकेच्या मलनि:सारण विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्या अनुषंगाने अद्याप पर्यंत किती कामे पूर्ण झाली असून मलनि:सारण सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (१८-०९-२०२५) : (१) हे अशंत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) बृहन्मुंबई महानगपालिकेचे सध्या २०७० कि.मी. लांबीचे मलनिःसारण वाहिन्यांचे जाळे कार्यान्वित आहेत. सन २०१६-१७ पासून मुंबई मलनिःसारण सुधारणा कार्यक्रमाला (MSIP) सुरुवात करण्यात आलेली आहे. या अंतर्गत आतापर्यंत १०७ कि.मी. लांबीची मलनिःसारण वाहिन्या टाकण्यात आल्या आहेत.

मिठी नदी पॅकेज १ प्रकल्पांतर्गत पवई येथे ८ द.ल.ली. प्रती दिन इतक्या क्षमतेच्या मलजल प्रक्रिया केंद्राचे काम पुर्ण झाले आहे. तर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई मलनिःसारण प्रकल्पांअतर्गत ७ मलजल प्रक्रिया केंद्राची कामे प्रगतीपथावर आहेत.

तात्पुरती व्यवस्था म्हणून घाटकोपर, भांडूप, वर्सोवा आणि मालाड सांडपाणी प्रक्रिया केंद्र येथे मलजलावर बायोरेमेडीशन तंत्रज्ञानाव्दारे प्रक्रिया करण्यात येत आहे. वांद्रे व वरळी या सांडपाणी प्रक्रिया केंद्रांत बायोरेमिडीएशन तंत्रज्ञानाव्दारे मलजलावर प्रक्रिया सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईसह ठाण्यातील औषध कंपन्यांकडे औषध विक्रीचा परवाना नसतानाही ऑनलाईन औषध विक्री होत असल्याबाबत

(२६) ४५३० (०५-०५-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ) : सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह, ठाण्यातील औषध कंपन्यांकडे औषध विक्रीचा परवाना नसतानाही ते ऑनलाईन औषध विक्री करत असल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अन्न व औषध प्रशासनाने घरपोच सेवा पुरविणाऱ्या कंपनीच्या माध्यमातून मुंबई व ठाण्यामध्ये ऑनलाईन औषध विक्री करणाऱ्या तीन कंपन्यांवर छापा टाकला हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर छाप्प्यामध्ये दोषी आढळून आलेल्या कंपन्यांवर कारवाई करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. नरहरी झिरवाळ (०८-१०-२०२५) : (१) (२) व (३) अन्न व औषध प्रशासनाने दि.२०.०१.२०२५ रोजी ऑनलाईन औषध विक्री करणाऱ्या कंपन्यांवर छापा टाकून (१) मे.स्कुटसी लॉजिस्टीक, मालाड (प),मुंबई
(२) मे. भगवती स्टोअर्स प्रा.लि.शितल, कांदिवली (पू)

(३) मे.फोक्लो टेक्नोलॉजी प्रा.लि. ठाणे (पश्चिम) या तीन ठिकाणी तपासणी केली. या तीन ठिकाणी औषध विक्रीचा परवाना नसतानाही औषधांची ऑनलाईन विक्री करत असल्याचे आढळून आले.

सदर तिन्ही संस्थामधून १७ नमुने विश्लेषणार्थ घेण्यात येवून उर्वरीत साठा जप्त करण्यात आला आहे. सदर नमुन्यांचा विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतर, तपासाअंती संबधितांविरूद्ध औषधे व सौदर्य प्रसाधने, १९४० च्या कायदयांअंतर्गत पुढील कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

शहरातील आपला दवाखान्यामध्ये सर्व प्रकारच्या चाचण्या बंद असल्याने रुग्णाची होत असलेली गैरसोय

(२७) ४७२५ (०१-०५-२०२५). श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे 'आपला दवाखाना' मध्ये गेल्या महिन्याभरापासून सर्व प्रकारच्या चाचण्या बंद करण्यात आल्या असून, त्या सुरु होण्यास अद्याप आणखी महिनाभराचा कालावधी लागणार असल्याचे दि, ०७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील झोपडपट्टी भागात राहणाऱ्या गरिबांना त्यांच्या घरापासून अवघ्या १० मिनीटांच्या अंतरावर दर्जेदार आणि मोफत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य शासनाने ही आरोग्य केंद्र योजना आणली होती, हे खरे आहे काय
(३) असल्यास, शहरातील २५० ठिकाणी हे दवाखाने रात्री १० पर्यंत सुरु ठेवल्याने सर्वसामान्य नागरिकांना त्यांचा लाभ मिळत होता. मात्र दवाखान्यातील कंत्राटदाराचा करार महिनभरापूर्वी संपल्याने नमुने घेण्याची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली असून मात्र तपासाची गती अतिशय मंद असल्याचा दावा रुग्णांनी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे हि खरे आहे काय
(४) असल्यास, सदर प्रकरणांबाबत रुग्णांच्या दृष्टीने आपला दवाखाना मधील सर्व चाचण्या विना-विलंब सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे 'आपला दवाखाना मधून कंत्राटदार नेमूण मोफत रक्त तपासणीच्या सेवा पुरविण्यात येत होत्या. या कंत्राटदाराचा करार १५ डिसेंबर २०२४ ला संपुष्टात आल्यानंतर तेव्हापासून बृहन्मुंबई महापालिकेच्या नियमित दवाखाने व आपला दवाखान्यामार्फत विविध रक्त चाचण्या मोफत करण्यात येत आहेत. तसेच नवीन कंत्राटदार नेमण्यासाठी निविदा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खाते यांच्या मार्फत सुरु आहे.
(२) मुंबईतील झोपडपट्टी भागात राहणाऱ्या गरिबांना त्यांच्या घराजवळ हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे 'आपला दवाखाना' मार्फत पूर्वीप्रमाणे सेवा देण्यात येत आहेत. तसेच, नियमित दवाखाने व आपला दवाखान्यामार्फत विविध रक्त चाचण्या मोफत करण्यात येत आहेत.
(३) हे खरे नाही,
रुग्णांना सर्व सेवा वेळेत पुरविल्या जात आहेत.
(४) बृहन्मुंबई महापालिकेच्या नियमित दवाखाने व आपला दवाखान्यामार्फत विविध रक्त चाचण्या मोफत करण्यात येत आहेत. नवीन कंत्राटदार नेमण्यासाठी मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

भायखळा (मुंबई) येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान आणि प्राणिसंग्रहालयात मत्स्यालय उभारण्याबाबत

(२८) ४७२६ (२३-०४-२०२५). श्री.दिलीप लांडे (चांदिवली) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भायखळा (मुंबई) येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान आणि प्राणिसंग्रहालयाचा विस्तार प्रस्तावित असून, या अंतर्गत हम्बोल्ट पेंग्विन केंद्राचा विस्तार करुन त्यासोबत नवीन मत्स्यालय उभारण्या येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील पर्यटकांमधील उत्साह पाहता सध्याच्या पेंग्विनच्या अधिवासासमोरील इंटरप्रिटेशन सेंटर इमारतीच्या तळमजल्यावर पाच हजार चौरस फुटांचा हॉल असून त्याचा वापर सध्या केला जात नसल्याने. त्याठिकाणी पेंग्विनसाठी विस्तार केला जाणार आहे, हे करत असतानाच आंतरराष्ट्रीय मानकांनुसार मत्स्यालय बांधण्याचे देखील प्रस्तावित होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन मत्स्यालय बांधण्यासाठी १२ कोटी ६१ लाख ८३ हजार ३०४ रुपये खर्च करणार असून यासाठी निविदा देखील काढण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, मत्स्यालयाच्या उभारणीत अनेक कायदेशीर अडचणी असुन पुरेश्या जागेअभावी हा प्रस्ताव पुर्णत्वास नेणे शक्य नसल्याने प्राधिकरणाने प्रस्ताव रद्द केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनामार्फत जागा उपलब्ध करुन नवीन मत्स्यालय बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे

नवीन मत्स्यालय बांधण्यासाठी रुपये ५३ कोटी ४९ लाख ०९ हजार ३१५ रुपये (वस्तु व सेवा कर वगळून) इतका खर्च होणे अपेक्षित आहे.

(४) हे खरे नाही.

(५) प्रस्तावित नवीन मत्स्यालयाकरिता निविदा प्रक्रीया पूर्ण करण्यात आली आहे.

यवतमाळ येथील परिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रस्तावाला मंजूरी देण्याबाबत

(२९) ४७७९ (०१-०५-२०२५). श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील नगरपरिषदेने घनकचरा व्यवस्थापनासाठी वैशीष्टयपूर्ण अंतर्गत सहा महिन्यापूर्वी पाठवलेला ३५ कोटीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घनकचरा व्यवस्थापनास १५ व्या वित्त आयोगाचे १० कोटी अद्यापर्यंत मिळाले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर प्रस्ताव व १५ व्या वित्त आयोगातील निधी नगरपरिषदेला उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२५) : (१), (२), (३), व (४) १५ व्या वित्त आयोगांतर्गत निधी पात्रतेसाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणूका होऊन तेथे लोकनियुक्त शासन (स्थायी समिती) अस्तित्वात असणे बंधनकारक आहे.

यवतमाळ नगरपरिषदसह राज्यातील काही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असून मा.सर्वोच्च न्यायालयाने निवडणूका घेण्यास प्रतिबंध केले होते.

प्रस्तुत न्यायालयीन प्रकरणामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने निवडणूका घेण्याबाबत दिनांक ०६.०५.२०२५ रोजी आदेश दिले आहेत. त्यानुसार निवडणूकीच्या प्रक्रियेअंती लोकनियुक्त शासन (स्थायी समिती) अस्तित्वात आल्यानंतर केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी वितरीत करण्यात येईल

तसेच सन २०२४-२५ मधील वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत मंजूर अर्थसंकल्पीय निधी, प्राप्त मागण्या यांचा विचार करुन निधी मंजूरीची कार्यवाही करण्यात येते.

वेशम अधिनियमात सुधारणा करण्यासाठी नेमलेल्या समितीच्या अहवालाच्या कार्यवाहीबाबत

(३०) ५०८३ (०१-०५-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने वेशम अधिनियमात बदल करण्यासाठी सहकार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचा अहवाल राज्य शासनास प्राप्त झाला असून अद्याप त्यावर कार्यवाही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेशम अधिनियमात बदल करण्यासाठी अहवाल प्राप्तीनंतर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय?

श्री. एकनाथ शिंदे (३०-०९-२०२५) : (१), (२) व (३) वेशम अधिनियमात बदल करण्यासाठी सहकार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने महाराष्ट्र वेशम मालकी अधिनियम, १९७० नुसार अधिनियमातील सुधारणा करण्याच्या शिफारशी ई-मेल व्दारे प्राप्त झालेले आहेत. तथापि, तसेच महाराष्ट्र वेशम मालकी नियम, १९७२ मध्ये सुधारणा करण्याबाबतच्या शिफारशी अद्याप अप्राप्त आहेत. अहवाल प्राप्त झाल्यानंतर विधी व न्याय विभागाशी विचारविनिमय करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुंबईतील अंधेरी(प) येथील मोगरा नाल्याच्या रुंदीकरण व संरक्षक भितीच्या बांधकामास होत असलेल्या विलंबाबाबत

(३१) ५२५५ (०१-०५-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी (प) येथील अंधेरी सबवे तसेच अंधेरी (पूर्व) अंतरराष्ट्रीय विमानतळ येथे पावसाळ्यात पाणी साचून नागरिक व वाहन चालकांना होत असलेला त्रास दूर करण्यासाठी वर्सोवा येथील शुटींग ब्रीज ते मिल्लत नगर ब्रीज येथील अनधिकृत झालेली बांधकामे हटवून मोगरा नाल्याची रुंदी वाढवून संरक्षक भिंत बांधण्याकरिता लोकप्रतिनींधीनी महानगरपालिका आयुक्त व अतिरिक्त महापालिका आयुक्त (प्रकल्प) यांना दिनांक १२ ऑगस्ट, २०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चितळे समितीच्या अहवालानुसार सन २००५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीनंतर ब्रीमस्ट्रोवॅड प्रकल्पात नाल्याच्या रुंदीकरणाचे काम प्रस्तावीत असतानाही सदरहू कामास विलंब झाल्याने लोकप्रतिनिधींनी पुन्हा दिनांक ४ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास स्मरणपत्र पत्र दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू नाल्याचे रुंदीकरण व संरक्षक भिंतीचे काम पावसाळापूर्वी करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, सदरहू मोगरा नाला रुंदीकरण व संरक्षण भिंत बांधण्याच्या कामास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

श्री. एकनाथ शिंदे (१८-०९-२०२५) : (१) वर्सोवा येथील शूटींग ब्रीज ते मिल्लत नगर ब्रीज येथे मोगरा नाल्याची रुंदी वाढवून संरक्षक भिंत बांधण्याकरिताची निविदा प्रक्रीया प्रगतीपथावर आहे. तसेच, नाला रुंदीकरणाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पर्जन्य जलवाहिन्या विभागाकडून रुंदीकरणाचा प्रस्तावाबाबतची कार्यवाही सुरु आहे. सदर प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/प विभागास प्राप्त झाल्यानंतर अतिक्रमणाबाबत निर्णय घेण्याचे प्रस्तावित आहे.
(२) हे खरे आहे.
(३) वर्सोवा येथील शूटींग ब्रीज ते मिल्लत नगर ब्रीज येथे मोगरा नाल्याची रुंदी वाढवून संरक्षक भिंत बांधण्याकरिताची निविदा प्रक्रीया प्रगतीपथावर असून नाला रुंदीकरणाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पर्जन्य जलवाहिन्या विभागाकडून रुंदीकरणाचा प्रस्तावाबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) सदर नाला समुद्र किनारी नियमण क्षेत्र (C.R.Z.) या क्षेत्रात येत असल्याने पर्जन्य जलवाहिन्या विभागामार्फत दि.२२.०८.२०१३ अन्वये सचिव, महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांना समुद्री किनारी नियमण क्षेत्रात सदर नाला रुंदीकरण बांधकाम करण्यासाठी अर्ज करण्यात आला होता. तथापि, MCZMA यांनी त्यांची परवानगी नाकारल्यामुळे मोगरा नाल्याचे शूटींग ब्रीज ते मिल्लत नगर ब्रीज या दरम्यानचे नाल्याच्या रुंदीकरण व बांधकामाचे कामास विलंब झाला आहे. सध्या प्रस्तावित कामांमध्ये कंत्राटदाराने MCZMA व इतर आवश्यक ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन काम करण्याची अट निविदेत अंतर्भुत करण्यात आली आहे.

मुंबई महानगरपालिकेतील प्रशासकीय मंजूरी व पात्र असतानाही सहाय्यक अभियंत्यांना कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती देण्यात आली नसल्याबाबत

(३२) ५२५६ (०१-०५-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेत कार्यकारी अभियंता पदासाठी माहे फेब्रुवारी, २०२४ वा त्या दरम्यान मध्ये प्रशासकीय मंजूरी मिळून पात्रता असतानाही अद्याप १५० सहाय्यक अभियंत्यांना कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती देणेबाबतची कार्यवाही गत ४ वर्षापासून प्रलंबित असल्याचे नुकतेच निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्यस्थितीत सहाय्यक अभियंत्यांना कार्यकारी अभियंता पदावर कोणत्या निकषनुसार कार्यभार देण्यात येत असणे, तसेच कार्यकारी अभियंता हे २ ते ३ विभागाचा कार्यभार एकत्रितरित्या पहात असल्याने त्यांच्यावर अतिरिक्त कामाचा ताण येऊन कामाची गुणवत्ता ढासळत असून त्यास शारिरिक व मानसिक त्रास होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिका प्रशासनाने प्रशासकीय मंजूरी मिळूनही उक्त ५० सहाय्यक अभियंत्यांना पदोन्नतीने कार्यकारी अभियंता पदावर नियुक्ती न देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रलंबित असलेली १५० सहाय्यक अभियंत्यांना पदोन्नतीने तात्काळ कार्यकार अभियंता पदावर नियुक्ती देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२४-०९-२०२५) : (१) अंशत: खरे आहे,
सन २०२१ ते २०२४ पर्यंत कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या संवर्गाच्या ७९ जागा व कार्यकारी अभियंता (यां.व वि.) संवर्गाच्या ३४ जागा रिक्त आहेत. अशा एकूण ११३ जागा रिक्त आहेत. त्या भरण्यास प्रशासकीय मंजुरी अनुक्रमे माहे फेब्रुवारी २०२४ व माहे जुलै २०२४ मध्ये प्राप्त झाली आहे.
(२) अंशत: खरे आहे,
प्रशासकीय गरजेनुसार काही ठिकाणी कार्यकारी अभियंता यांना अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. तसेच काही सेवाज्येष्ठ सहाय्यक अभियंता यांना कार्यकारी अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे.
(३) कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदावरील पदोन्नतीसाठी तयार करण्यात आलेल्या सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या

पदाच्या सेवाज्येष्ठतेबाबत (१) WP No. ४०३३ of २०२३ (२) WP No. ३४८० of २०२४ (३) WP No. ४८४३ of २०२४ (४) WP No. ५१०४ of २०२४ प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. त्यामधील WP No. ४८४३ of २०२४ प्रकरणी कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देण्यासाठी यथास्थिती ठेवण्याचे मा. न्यायालयाचे आदेश आहेत.

(४) सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या पदावरील अभियंत्यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देण्यासाठी विहीत प्रशासकीय प्रक्रिया कार्यान्वीत करण्यात आली आहे. तथापि, मा. उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या न्यायालयीन प्रकरणी मा. न्यायालयाच्या आदेशानुसार पदोन्नतीची कार्यवाही करण्यात येईल.

सहाय्यक अभियंता (यां.व वि.) यांची कार्यकारी अभियंता (यां.व वि.) पदावर प्रशासकीय विहित प्रक्रियेनुसार पदोन्नती देण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरातील पायाभूत सुविधांच्या कामासाठी मंजूर करण्यात आलेला निधी नागपूर महानगरपालिकेस उपलब्ध करून देण्याबाबत

(३३) ५८४७ (०१-०५-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने नागपूर शहराच्या पायाभूत सुविधांच्या कामासाठी सन २०२२ ते २०२५ या कालावधीत नागपूर महानगरपालिकेला १,९८७.६० कोटींचा निधी मंजूर केला असून त्यापैकी आजमितिपर्यंत केवळ ३५७.१२ कोटी रुपयांचा निधी वितरित केला असल्याचे दिनांक ११ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर महानगरपालिकेने उर्वरित १,६३०.४८ कोटींचा निधी तात्काळ उपलब्ध करून देण्याची मागणी नागपूर महानगरपालिकेने राज्य शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने नागपूर शहरातील पायाभूत सुविधांच्या कामासाठी मंजूर करण्यात आलेला निधी नागपूर महानगरपालिकेस तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२५) : (१), (२), (३) व (४) या विभागाच्या विविध योजनेंतर्गत सन २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत नागपूर महानगरपालिकेस रु.३६२२.९० कोटी निधी मंजूर केलेला आहे. त्यापैकी रु.२५५३.३८ कोटी निधी वितरीत करण्यात आलेला असून उर्वरीत रु.१०६९.५२ कोटी निधी वितरीत करणे प्रलंबित आहे.

सन २०२५-२६ मधील महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत सोयीसुविधांचा विकास योजनेअंतर्गत मंजूर अर्थसंकल्पीय निधी, प्राप्त मागण्या यांचा विचार करून निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येते.

नागपूर शहरातील सांडपाण्याच्या तक्रारींचा निपटारा जलदगतीने करण्याबाबत

(३४) ५८४८ (०१-०५-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील सांडपाणी व्यवस्थापन सुरळीत असावे, यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागाकडे पाठविण्यात आलेल्या तक्रारीपैकी तब्बल ७० टक्के तक्रारी प्रलंबीत राहिल्या असल्याचे दिनांक ८ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागाकडे पाठविण्यात आलेल्या ५८३ तक्रारीपैकी ३८५ तक्रारी अद्यापही कायम आहेत, हे हि खरे आहे काय;
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय , चौकशीत काय आढळून आले , त्यानुषंगाने नागपूर शहरातील सांडपाण्याच्या तक्रारींचा निपटारा जलदगतीने होण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) : (१) व (२) हे खरे नाही.
नागपूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागाकडे पाठविण्यात आलेल्या १२९९ तक्रारी आहेत. यातील ८७३ म्हणजेच ६७.२० टक्के तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत. १२२ तक्रारींबाबत संबंधित झोनल अधिकाऱ्यांद्वारे अंमलबजावणी सुरू आहे. १६३ तक्रारीकरीता मान्यतेस्तव कार्यवाही सुरू आहे. १४१ तक्रारी म्हणजेच १०.८५ टक्के प्रलंबित आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

छत्रपती संभाजीनगर शहरात कचऱ्याबाबत येत असलेल्या समस्यांचे निवारण करण्याबाबत

(३५) ५८५९ (०१-०५-२०२५). श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर शहरांची लोकसंख्या सुमारे २० लाखापेक्षा जास्त असतांना या शहरात केवळ ३०० घटांगाडया व १२०० कर्मचारी असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शहरातून कच-याबाबत रोज शेकडो तक्रारी प्राप्त होत आहेत, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरातील कचरा समस्या सोडविण्याकरिता महानगरपालिकेने कोणत्या विशेष उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१९-०९-२०२५) : (१) अंशत: खरे आहे,
महानगरपालिकेडून निविदा प्रक्रिया राबवून नियुक्त केलेली एजन्सी पी.गोपीनाथ रेड्डी यांचेकडून कचरा संकलनासाठी ३१६ घंटागाडया व १२०० कर्मचारी कार्यरत आहेत.
या व्यतिरिक्त सार्वजनिक स्वच्छते अंतर्गत महानगरपालिका आस्थापनेवरील १७००, बचत गटाचे ३५२ व कंत्राटी १५९ असे २२११ कर्मचारी आहेत.
(२) अंशत: खरे आहे,
महानगरपालिकेकडे कचऱ्याबाबत ऑनलाईन प्रतिदिन सरासरी १५ ते २० तक्रारी प्राप्त होतात. तक्रारीची तात्काळ दखल घेऊन १२ तासाच्या आत तक्रारीचे निवारण करण्यात येते.
(३) महानगरपालिकेडून कचरा संकलन प्रक्रिया केंद्रापर्यंत वाहतुक व घनकचरा प्रक्रिया करण्यासाठी पी.गोपीनाथ रेड्डी एजन्सी नियुक्त केली असून यांच्याकडील १२०० कर्मचारी शहराच्या विविध भागात घरोघरी जाऊन कचरा संकलीत करतात.
निवासी मिळकती/कॉलनी/प्रभाग /वस्त्यामध्ये सकाळच्या सत्रामध्ये व व्यवसायिक भागातील कचरा सायं.४ ते रात्री ११ पर्यंत जमा केला जातो. तसेच सर्व कचरा संकलीत होईपर्यंत घंटागाडी कार्यरत असते.
तसेच सार्वजनिक उत्सव, मोठे सन या दरम्यानच्या कालावधीत घंटागाडीच्या फेऱ्या वाढविल्या जातात.
छत्रपती संभाजीनगर शहराच्या हर्सूल, चिकलठाणा, पडेगांव व कांचनवाडी या चार ही बाजूस घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया केंद्र कार्यान्वीत आहेत.
संकलीत होणारा सर्व ठिकाणचा कचरा नजीकच्या प्रक्रिया केंद्रावर जमा झाल्यावर जमा कचऱ्यावर

शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावली जाते
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

खारघर (ता.पनवेल, जि.रायगड) येथील नुकसान ग्रस्त आदिवासी बांधवांना नुकसान भरपाई देण्याबाबत

(३६) ७१६२ (२३-०८-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारघर (ता.पनवेल, जि.रायगड) येथील नुकसान ग्रस्त आदिवासी बांधवांना तातडीने नुकसान भरपाई देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई यांच्याकडे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिडको प्रशासनातील अधिका-यांच्या दुर्लक्षामुळे व नियोजन शुन्य कारभारामुळे अनधिकृत इमारती तोडताना आदिवासींच्या घरांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून आदिवासी बांधवांच्या घरांचे नुकसान करणा-या संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करून आदिवासींना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२९-०९-२०२५) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
सिडको नियोजन प्राधिकरणाने नवी मुंबई विकास आराखड्यामध्ये खारघर नोडमधील सेक्टर-५, भूखंड क्र.३६के या भूखंडावर खुली जमीन (Open Space) म्हणून जमिनीचा वापर निश्चित केला आहे. सिडकोच्या अनधिकृत बांधकामे विभागामार्फत सदर भूखंडावरील स्थळ पाहणीअंती तळ मजला + पाच मजले असलेली अनधिकृत इमारतीचे बांधकाम सुरु असल्याचे दिसून आले. सदर अनधिकृत बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३ (१) (अ) अन्वये दि.२४.३.२०२५ रोजी नोटीस बजावण्यात आली. सदर अनधिकृत इमारत सिडकोमार्फत एप्रिल, २०२५ मध्ये पूर्णत: निष्कासित करण्यात आली आहे.
सदर इमारतीच्या पुर्वेस व दक्षिणेस कच्च्या पक्क्या स्वरुपाची सुमारे १५ अनधिकृत बांधकामे (झोपड्या / घरे) असून त्यांना उक्त अधिनियमानुसार दि.२७.३.२०२५ रोजी नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. वरील इमारतीचे निष्कासन करतांना सदर झोपड्यांचे कोणतेही नुकसान झालेले नाही. सदर अनधिकृत झोपड्या / घरे याबाबत उक्त अधिनियमाद्वारे विहित कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

नवी मुंबई सिडको हद्दीतील वर्षानुवर्षे अस्तित्वात असलेल्या झोपडपट्पटी वासियांच्या झोपडया कायमस्वरूपी करण्याबाबत

(३७) ७३२९ (२५-०८-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई सिडको हद्दीतील वर्षानुवर्षे अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टी वासियांच्या झोपड्या कायमस्वरूपी करण्याबाबत निश्चित धोरण नसल्यामुळे झोपडपट्टी वासियांच्या पुनर्वसनाचा प्रश्न अद्यापही प्रलंबीत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मा.पंतप्रधान यांचे सर्वांसाठी घरे उपलब्ध करून देण्याचे स्वप्न असताना देखील सिडको प्रशासनाच्या उदासिन धोरणामुळे गेल्या अनेक वर्षापासून वास्तव्य करित असलेल्या झोपडपट्पटी वासियांच्या झोपड्या अनधिकृत ठरवून सिडको प्रशासनाने नागरिकांना बेघर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पनवेल-उरण तालुक्यातील सिडको हद्दीतील गेल्या अनेक वर्षापासून वास्तव्य करित असलेल्या झोपडपट्टी वासियांच्या पुनर्वसनाबाबत निश्चित धोरण आखण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२९-०९-२०२५) : (१), (२) व (३) महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार सिडको महामंडळाची नवी मुंबई प्रकल्पासाठी "नवनगर विकास प्राधिकरण" म्हणून नियुक्ती केली आहे व त्याकरीता ठाणे, पनवेल व उरण तालुक्यातील एकूण ९५ गावे अधिसूचित केली आहेत. नवी मुंबई प्रकल्प या सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित केलेल्या जमिनींवरील अतिक्रमणाच्या नियमितीकरणासंदर्भात किंवा पुनर्वसनासंदर्भात नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारित) नियमावली, २००८ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मध्ये अतिक्रमण नियमितीकरणासंदर्भात कोणतीही तरतुद नाही.

सदरच्या जमिनी / क्षेत्र नवी मुंबई प्रकल्पाच्या विकासासाठी आवश्यक असल्याने सिडको हद्दीतील बेकायदेशीर / अनधिकृत बांधकामांवर सिडकोमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदींनुसार विहीत पध्दतीने कारवाई करण्यात येते. त्यामुळे अशी अनधिकृत बांधकामे / झोपडपट्टी वासियांचा पुनर्वसनाचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

धारावी पुनर्विकास प्रकल्पाला विरोध असताना अदानी समूहाच्या कंपनीकडून सुरू असलेल्या सर्वेक्षणाबाबत

(३८) ७५२८ (१८-०८-२०२५). श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी धारावीतील रहिवाशांना विश्वासात न घेता परस्पर सर्वेक्षण सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अदानी समूहाच्या 'एनएमपीडीएल' या कंपनीकडून सदर सर्वेक्षण सुरू असून सर्वेक्षणावेळीच धारावीकरांकडून सक्तीने स्टॅम्पपेपरवर नोटरी करून सक्तीने अपात्र ठरवण्यात येत असल्याचा आरोप तेथील रहिवाशांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धारावी पुनर्विकास प्रकल्पाला तेथील रहिवाशांनी केलेला तीव्र विरोधव सक्तीने सुरू असलेले सर्वेक्षण आणि नोटरी थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१८-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.

धारावी अधिसूचित क्षेत्रांतर्गत धारावी पुनर्विकास प्रकल्पासंबंधी झोपडपट्टीधारकांचे पात्र/अपात्रता तपासण्यासाठी घरोघरी सर्वेक्षण करण्याबाबत जाहीर सूचना दि.११/०३/२०२४ रोजी धारावी अधिसूचित क्षेत्रात तसेच विविध भाषांमध्ये स्थानिक वृत्तपत्रांत प्रसिध्द करण्यात आलेली होती, त्यानुसार सदरचे सर्वेक्षण सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोकणातील रत्नागिरी ते सातारा हा प्रवास वेगवान होण्यासाठी नवीन केबल स्टेट ब्रिज विकसित होणार असल्याबाबत

(३९) ७७७० (२३-०८-२०२५). श्री.अमोल खताळ (संगमनेर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण कोकणातील रत्नागिरी ते सातारा हा प्रवास वेगवान होण्यासाठी एक नवीन केबल स्टेट ब्रिज प्रकल्पाचे काम टी अँड टी कंपनीला माहे मे, २०२५ वा त्यासुमारास देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नव्या ब्रिजमुळे रत्नागिरी जिल्ह्यातून महाबळेश्वर पर्यंतचे अंतर कमी होवून रत्नागिरीहून महाबळेश्वरला जलद गतीने जाता येणार असून या भागातील नागरिकांना आणि पर्यटकांना याचा मोठा फायदा होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर केबल स्टेट ब्रिजचे काम वेळेत पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१०-१०-२०२५) : (१) होय.

(२) होय, हे खरे आहे.

(३) कुंभरोशी कळमगांव तापोळा अहिर रस्ता प्रजिमा -१७ तापेळा अहिर दरम्यान कि.मी. ५५/९०० मध्ये कोयना जलाशयावर केबल स्टे पूलाचे काम डिसेंबर -२०२५ पर्यंत पूर्ण करणेचे नियोजन आहे.

सातारा कास बामणोली रस्ता (प्रजिमा-२६) बामणोली ते दरे दरम्यान कायेना जलाशयावर केबल स्टेड पुलाचे काम एप्रिल-२०२७ पर्यंत पूर्ण करणेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील बेस्ट उपक्रमाच्या प्रवासी तिकिट दर दुप्पट वाढविण्याच्या प्रस्तावाला मुंबई महानगरपालिकेने मंजूरी दिल्याबाबत

(४०) ७८१९ (१७-०६-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बेस्ट उपक्रमाच्या प्रवासी तिकिट दर दुप्पट वाढविण्याच्या प्रस्तावाला मुंबई महानगरपालिकेने मंजूरी दिल्यानंतर सदर प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी राज्य परिवहन प्राधिकरणाकडे माहे एप्रिल ,२०२५ मध्ये वा त्या दरम्यान पाठविण्यात आला आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावामध्ये दिव्यांग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, शालेय विदयार्थी इत्यांदीना भाडेवाढीतून वगळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर निर्णयाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे ?

श्री. एकनाथ शिंदे (२४-०९-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) सद्यस्थितीत उपक्रमाच्या बससेवांवर दिव्यांग व्यक्ति जेष्ठ नागरीक, शालेय विद्यार्थी, खाजगी शैक्षणिक संस्था,महाविद्यालय, विद्यापीठ यामधून शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना विद्यमान सवलतीच्या दरात बसपास उपलब्ध आहेत. त्याअनुषंगाने शुक्रवार, दि. ०९ मे, २०२५ पासून प्रवासभाड्याच्या सुसुत्रिकरणाच्या माध्यमातुन झालेल्या भाडेवाडीत दिव्यांग व्यक्ति, शालेय विद्यार्थी, खाजगी शैक्षणिक संस्था, महाविद्यालय, विद्यापीठ यामधून शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या बसपासच्या मुल्यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

प्रवासभाडयाच्या सुसूत्रिकरणामध्ये ज्येष्ठ नागरिकांकरीता प्रौढ भाडे आकारण्यात येते व प्रतिमाह बसपासमध्ये रु.५०/- इतकी सवलत देण्यात येत आहे.

राज्यातील कंजुमर गायडन्स सोसायटी ऑफ इंडिया (मुंबई) या संस्थेमार्फत चालवली जाणारी राज्य ग्राहक हेल्पलाईन बंद करण्यात आल्याबाबत

(४१) ७८३५ (१८-०८-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कंजुमर गायडन्स सोसायटी ऑफ इंडिया (मुंबई) या संस्थे मार्फत चालवली जाणारी राज्य ग्राहक हेल्पलाईन बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास राज्यातील ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण राष्ट्रीय ग्राहक लाईनद्वारे करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्थेमार्फत चालवली जाणारी हेल्पलाईन बंद करण्याची कारणे काय आहे,

(४)असल्यास,याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (०६-१०-२०२५) : (१) व (२) होय.

(३) या प्रकरणी ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण गुणवत्तेने, एकाच केंद्रिकृत ठिकाणी अधिक कार्यक्षम पध्दतीने व्हावे, याकरिता राज्य स्तरीय हेल्पलाईन्स बंद करुन राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाईन (NCH) मध्ये विलीन करण्याबाबत केंद्र शासनाच्या उपभोक्ता मामले विभागाने निर्देश दिले असल्याने, राष्ट्रीय हेल्पलाईन मार्फत तक्रार निवारण सुविधा उपलब्ध आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

कोरची (जि.गडचिरोली) तालुक्यातील रेशनकार्डधारक लाभार्थ्यांना नियमित धान्य मिळणेबाबत

(४२) ८१४५ (१८-०८-२०२५). श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरची (जि.गडचिरोली) तालुक्यातील बोटेकसा गावातील रेशेनकार्डधारक लाभार्थ्यांना नियमित वेळेत धान्य मिळत नसल्याबाबतच्या तक्रारी येथील ग्रामस्थांनी कोरची तहसील प्रशासनाकडे केल्या असल्याचे दिनांक १९ मे,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा तक्रारी मागील दोन-तीन वर्षापासून कोरची तहसील कार्यालयात केलेल्या आहेत, परंतु याकडे प्रशासनाने अक्षम्य दुर्लक्ष करुन अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही केली नसल्याने ग्रामस्थांमधून संताप व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार रेशनकार्डधारकांना नियमित धान्य न पुरविणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यासह लाभार्थ्यांना नियमित धान्य उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. छगन भुजबळ (३०-०९-२०२५) :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) दि.१९ मे, २०२५ रोजी बोटेकसा ग्रामस्थांकडून तक्रार अर्ज तहसिल कार्यालय कोरची येथे प्राप्त होताच दि.२० मे,

२०२५ रोजी सदर रास्त भाव दुकानाची चौकशी करून कार्यवाही करण्याकरीता अहवाल जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे सादर करण्यात आला. चौकशी अहवालात आढळून आलेल्या दोषानुसार सदर दुकान रद्द करण्यात आले आहे व दुकान तात्पुरत्या स्वरूपात धान्य वाटप करण्याकरीता जवळच्या ३ कि.मी. अंतरावरील दुकानास संलग्नित करण्यात आले आहे. माहे मे, २०२५ महिन्याचे धान्य लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले आहे. तसेच माहे जून, जुलै व ऑगस्ट - २०२५ या महिन्याचे धान्य जोडण्यात आलेल्या दुकानामार्फत वाटप करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला येथील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात निविदा प्रक्रियेतून सुशिक्षित बेरोजगारांना वगळण्यात आल्याबाबत

(४३) ८६६४ (२५-०८-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात नेत्र वॉर्ड, ब्लड बँक, महिला वसतिगृह, टी.बी.वॉर्ड येथे विद्युत उपकरणे बसविण्याची कामे एकाच इमारतीत असताना एकत्रित निविदा न काढता सार्वजनिक बांधकाम विभागाने (विद्युत विभाग) विविध कामांचे वेगवेगळी निविदा काढण्यात आली असल्याचे बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील निविदा प्रक्रियेत सुशिक्षित बेरोजगारांना ३३ टक्के कामे वाटप करण्याच्या शासन निर्णय असतांना सदर निविदा प्रक्रियेत सुशिक्षित बेरोजगारांना वगळण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१४-१०-२०२५) : (१) अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाचा परिसर बराच विस्तीर्ण असून परिसरामध्ये वेगवेगळया विभागाच्या अनेक इमारती आहेत.
सदर सर्व कामे एकाच इमारतीमधील नाहीत.सदर सर्व कामे ही शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची असली तरी प्रत्येक विभागाने वेगवेगळया वेळी केलेल्या मागणीनुसार निर्माण झालेली कामे असल्यामुळे वेगवेगळी अंदाजपत्रके त्या त्या वेळी तयार करून घेण्यात आली आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

नाशिक जिल्हयात रेशन दुकानांवर छापे टाकण्यात आल्याबाबत.

(४४) ८७७८ (२९-०६-२०२५). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनाने सादर केलेल्या कार्यक्रम अंदाजपत्रक सन २०२५-२६ मध्ये माहे ऑक्टोबर, २०२३ ते सप्टेंबर, २०२४ या कालावधीत राज्यात ५९५ रेशन दुकानावर छापे टाकून ४४५ व्यक्तीना अटक केली तर १२३ जणांवर दोषारोपपत्र दाखल करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक जिल्हयात किती रेशनदुकानावर छापे टाकण्यात आल्या व किती जणांना अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. छगन भुजबळ (१७-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) राज्याचे पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीनुसार नाशिक जिल्ह्यामध्ये माहे ऑक्टोबर,२०२३ ते सप्टेंबर,२०२४ या कालावधीमध्ये नाशिक जिल्ह्यामध्ये एकूण ९३ रास्त भाव दुकानांवर धाडी टाकण्यात आल्या असून, एकूण ८२ व्यक्तींना अटक करण्यात आली होती. तसेच ४ व्यक्तींवर आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. जिल्ह्यातील पुरवठा यंत्रणेने केलेल्या नियमित तपासणीमध्ये १२ रास्त भाव दुकानाचे प्राधिकारपत्र रद्द केले असून, १२ रास्त भाव दुकानदारांची अनामत रक्कम जप्त केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

आनंद नगर, धाराशिव येथील पशुसंवर्धन विभागाच्या जागेत ‘सारथी भवन’ चा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत

(४५) ९३८६ (१८-०८-२०२५). श्री.राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आनंद नगर, धाराशिव येथील पशुसंवर्धन विभागाची वापरात नसलेली ४ एकर जागा ‘सारथी भवन’ करीता सारथी या स्वायत्त संस्थेकडे वर्ग करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविण्याबाबत जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्याकडे लोकप्रतिनिधिनी माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सारथी मार्फत मराठा समाजातील विद्यार्थ्यांसोबत समाजातील सर्व घटकांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी व्यापक स्वरूपात उपक्रम आणि विविध योजना राबविण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्ह्यातील मराठा समाजातील जास्तीत जास्त विद्यार्थी आणि युवकांना सारथीच्या योजनांचा लाभ मिळण्यासाठी धाराशिव शहरातील पशुसंवर्धन विभागाच्या जागेत सुसज्ज सारथी भवन बांधण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत जागेची पाहणी संबंधित अधिकाऱ्यांसह स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली असून सदर जागा सारथी भवनासाठी सुयोग्य असून या ठिकाणी प्रशिक्षण केंद्र, सुसज्ज प्रशासकीय इमारत, मुलं आणि मुलींसाठी प्रशस्त वसतिगृह, अत्याधुनिक अभ्यासिका यासह भव्य ऑडिटोरियमचाही समावेश करता येऊ शकतो, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (१०-१०-२०२५) : (१) होय हे खरे आहे. मा.लोकप्रतिनिधीनी दिनांक १३.५.२०२५ रोजीच्या निवेदनान्वये जिल्हाधिकारी, धाराशिव यांना आनंदनगर, धाराशिव येथील पशुसंवर्धन विभागाची वापरात नसलेली ४ एकर जागा सारथी संस्थेकडे प्रशासकीय इमारत, प्रशिक्षण केंद्र,वसतीगृह, अभ्यासिका व ऑडिटोरीयम बांधण्यासाठी वर्ग करण्याबाबत प्रस्ताव शासनाला पाठविण्याबाबत मागणी केली आहे.
(२)होय हे खरे आहे.
(३)होय हे खरे आहे.
(४) स्थानिक लोकप्रतिनिधींनी पाहणी केली आहे ही बाब खरी आहे.
(५) सदर जागा पशुसंवर्धन विभागाशी संपर्क करुन सारथी संस्थेकडे वर्ग करण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव संस्थेने जिल्हाधिकारी, धाराशिव यांना सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक ११.६.२०२५ च्या पत्रान्वये संस्थेस कळविले आहे.

अद्यापपर्यंत सदरचा प्रस्ताव शासनास अप्राप्त आहे. त्यामुळे, धाराशिव शहरातील आनंदनगर येथील पशुसंवर्धन विभागाच्या जागेत सारथी भवन बांधण्याबाबत व जागा हस्तांतरणासंदर्भातील प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

बीड येथील रस्त्याची कामे केलेल्या मोहिनीराज कंस्ट्रक्शन,बीड यांनी पूर्वी केलेल्या कामाचा तपशील मिळण्याबाबत

(४६) १०२२१ (२५-०८-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाचे एस.एच.५५ ते म्हाळसजवळा-जरुड-बोरफडी-येळंब-चौसाळा रोड एमडीआर ३४ कि.मी. १५/६०० बांधकाम करण्यासाठी मोहिनीराज कंस्ट्रक्शन, बीड यांना कार्यारंभ दिनांक ११ मार्च, २०२४ रोजी वा त्यादरम्यान आदेश पारीत केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कार्यारंभ आदेश पारीत होत असतांना कार्यालयाने कंत्राटदाराच्या पुर्वीच्या कोणत्या कामाचे कागदपत्रे ग्राह्य धरण्यात आलेली आहे या बाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे दिनांक १५ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंत्राटदाराने पुर्वी केलेल्या कामाची माहिती स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार स्थानिक प्रशासनाकडे मागवुन अद्यापपर्यंत उपलब्ध होवू शकलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जबाबदार असलेल्या सर्व संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०८-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय निवेदन प्राप्त आहे.

(३) हे खरे नाही.

दिनांक ०९/०६/२०२५ रोजी मा. विधानसभा सदस्य यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

नवीन रेशनकार्डसाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांमध्ये वाढ करण्यात आल्याबाबत

(४७) १०९४६ (२९-०६-२०२५). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीन रेशनकार्ड काढण्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांमध्ये वाढ करण्यात आल्यामुळे नागरीकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास नवीन रेशनकाडे काढण्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांमध्ये वाढ करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार लाभार्थ्यांना होणारी अडचण दुर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. छगन भुजबळ (०६-१०-२०२५) : (१) व (२) हे खरे नाही.

नवीन रेशनकार्ड काढण्यासाठी दि.२९.०६.२०१३ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना व निकषानुसार आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून, नागरीकांना नवीन रेशनकार्ड वितरीत करण्यात येतात. दि. ०१.०८.२०२२ व दि. २०.१२.२०२३ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार रेशनकार्ड अर्जाच्या नमुन्यामध्ये बदल करण्यात आला आहे. तथापि, नवीन शिधापत्रिका देताना अन्य कोणत्याही नवीन कागदपत्रांची वाढ करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील राज्य महामार्ग ग्रामीण रस्त्यांची झालेली दुरवस्था

(४८) ११०९१ (२५-०८-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील प्रमुख्य राज्य महामार्ग, राज्य महामार्ग तसेच अनेक जिल्हामार्ग व ग्रामीण रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झालेली असून रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नादुरुस्त रस्त्यांवरुन सिमेंट, कोळसा आदी अवजड वाहनांच्या दिवस-रात्र वाहतुकीमुळे रस्त्याशेजारील शेतपिकेही काळवंडली असून शेतक-याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन वणी तालुक्यातील सर्व रस्त्यांच्या दुरुस्तीचे कामे तातडीने सुरु करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२५-०९-२०२५) : (१) सा.बां. विभागाच्या अखत्यारीतील प्रमुख राज्य मार्ग, राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्गाच्या काही लांबीत अवजड वाहतुकीमुळे खड्डे पडत असून सदर लांबीमध्ये खड्डे भरुन वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.

(२) सदर भागात ९ कोळश्याच्या खाणी असल्याने या खाणीतून होणाऱ्या अवजड वाहनांची वाहतूक रस्त्यावर आहे.

(३) सदर तालुक्यातील रस्त्यावर मजबुतीकरणाची व सुधारणा करणेची कामे निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

सदर रस्त्यावरील दैनंदिन देखभाल व दुरूस्तीची कामे वार्षिक देखभाल व दुरूस्ती कार्यक्रमांतर्गत वेळोवेळी हाती घेण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जत (जि.सांगली) तालुका येथे सार्वजनिक बांधकाम उप विभाग कार्यालयासाठी नवीन कार्यालयीन इमारत बांधण्याबाबत

(४९) १२९८५ (०९-०७-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुका हा भौगोलीक दृष्ट्या मोठा तालुका असून सदर तालुक्याच्या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे दोन कार्यालये असून सदरची दोन्ही कार्यालये ही एकाच कॅम्पसमध्ये असून सदर कार्यालयाच्या दोन्ही इमारती या जुन्या व अतिशय जीर्ण झाल्या असून सदर इमारती शासनाने ठरवून दिलेल्या चटई क्षेत्रफळाप्रमाणे नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे दोन्ही कार्यालयात काम करणारे अधिकारी / कर्मचारी यांना सुरळीत काम करण्यास बऱ्याच अडचणी निर्माण होत असून तालुक्यातील या कार्यालयाकडे कामकाजासाठी येणाऱ्या ठेकेदार तसेच अन्य नागरिकांना थांबण्यासाठी व प्रतिक्षा करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१ व २ साठी नवीन एकत्रित शासनाच्या मंजूर नकाशाप्रमाणे नवीन कार्यालयीन इमारत बांधण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१३-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) याबाबतची मागणी आढळून येत नाही.

(४) अस्तित्वातील इमारत अपुरी पडत असल्याने नवीन इमारत बांधणेकरीता प्रशासकीय मान्यतेसाठी अंदाजपत्रक तयार करण्याचे काम सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील लाभार्थ्यांसाठी नव्याने निकष निश्चित करण्यासाठी सहा जणांची समिती नेमली असल्याबाबत

(५०) १४३९३ (१८-०८-२०२५). श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील लाभार्थ्यांसाठी नव्याने निकष निश्चित करण्यासाठी अन्न व नागरी पुरवठा विभागाने शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा विभागचे नियंत्रक यांच्या अध्यक्षतेखाली सहा जणांची समिती नेमली असल्याचे माहे मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचा लाभ देण्यासाठी लाभार्थ्याकरिता अत्यल्प दरात भरडधान्य देण्यात येत असते मात्र केंद्र शासनाकडून प्राप्त होणा-या अन्नधान्यापैकी काही धान्य शिल्लक राहत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने ग्रामीण व शहरी लाभार्थ्यांच्या वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादेचे निकष तपासण्याचा निर्णय घेण्यात आला प्रश्न भाग १ मधील समितीने चौकशी करुन अन्नधान्य शिल्लक राहण्याबाबत आढावा घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (१६-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे. आधारभूत किंमत योजनेंतर्गत खरेदी केलेले भरडधान्य शिल्लक राहत नाही. सन २०२४-२५ मध्ये केंद्र शासनाकडून राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या नियतनापैकी ९१.६४ टक्के नियतनाचे वाटप करण्यात आले आहे. तर माहे एप्रिल,२०२५ ते जुलै, २०२५ दरम्यान सरासरी ९३.३६ टक्के नियतन पात्र लाभार्थ्यांना वितरित करण्यात आले आहे.
(३) शासन निर्णय दि.११.०४.२०२५ अन्वये नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यांत आलेली असून, समितीचा अहवाल अदयापि अप्राप्त आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन : **जितेंद्र भोळे**
नागपूर. **सचिव-१,**
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.